www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १२८ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## आयपीएसचा 'एस' म्हणजे सेवा.; राष्ट्रपतींचा IPS प्रशिक्षणार्थींना मोलाचा सल्ला

● ठाणे, यश सावंत :

कायद्याचे राज्य प्रस्थापित झाल्यावरच आर्थिक आणि सामाजिक विकास शक्य आहे, असे मत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) प्रशिक्षणार्थींच्या गटाला संबोधित केले. कायदा व सुव्यवस्था राखणे, न्याय सुनिश्चित करणे आणि नागरी हक्कांचे रक्षण केल्याशिवाय प्रगती हा शब्दच अर्थहीन ठरतो, असे त्या म्हणाल्या. महिलांवरील गुन्ह्यांबाबत राष्ट्रपती म्हणाल्या की ही एक गंभीर समस्या आहे, ज्याची मुळे आजारी मानसिकतेत तसेच घृणास्पद सामाजिक पूर्वग्रहांमध्ये आहेत. हा सर्व प्रथम गुन्हा आहे. म्हणून, त्याच्याशी लढण्यासाठी अनेक स्तरांवर कृती आवश्यक आहे.




भारतीय पोलीस सेवेत महिला अधिकाऱ्यांची संख्या वाढल्याबद्दल मुर्मू यांनी आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, या तुकडीत 188 प्रशिक्षणार्थींमध्ये 54 महिला अधिकारी आहेत, ही गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ आहे. महिला अधिकाऱ्यांची संख्या वाढवल्यास पोलिसांचे चारित्र्य सुधारू शकते, असे राष्ट्रपती म्हणाले. त्यांनी आयपीएस अधिकाऱ्यांना त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्याचा आणि त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत योगाचा समावेश करण्याचा सल्ला दिला. राष्ट्रपती म्हणाल्या, तुमच्या खांद्यावर मोठी जबाबदारी आहे. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. तुमच्या दिनचर्येत योग आणि ध्यान यांचा समावेश करा. आयपीएसचा 'एस' म्हणजे सेवा. देशाची आणि नागरिकांची सेवा करणे हेच प्राधान्य आहे.

पोलिस अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने आणि सहानुभूतीने पीडितेसोबत काम करावे. कायदा आणि सुव्यवस्था हा केवळ शासनाचा पाया नसून आधुनिक राज्याचा पाया आहे, असे राष्ट्रपती म्हणाल्या. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना कार्यक्षम, संवेदनशील आणि निर्भय राहण्यास सांगितले.

भारताच्या भविष्यासाठी पोलिसांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरेल. कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे आवश्यक आहे. मुर्मू यांनी पोलीस अधिकाऱ्यांना तांत्रिक ज्ञान आत्मसात करून गुन्हेगारांपेक्षा एक पाऊल पुढे राहण्याचा सल्ला दिला. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत झाली. मात्र गुन्हेगारही तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

## व्हीआय कंपनीला ग्राहक आयोगाचा दणका

### ज्येष्ठ नागरिकाला भरपाई देण्याचे आदेश



● मुंबई, विशाल कारंडे :

एका ज्येष्ठ नागरिकाची मोबाइल सेवा अचानक खंडित केल्याबद्दल तसेच त्याला आंतरराष्ट्रीय रोमिंग पॅक वापरून न देता त्याची एक प्रकारे मानसिक छळवणूक करण्यात आली, असे निरीक्षण नोंदवित ग्राहक मंचाने व्होडाफोन-आयडिया कंपनीला संबंधित ज्येष्ठ नागरिकाला ५० हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले.

ज्येष्ठ नागरिकाची गैरसोय, मानसिक आणि आर्थिक छळ अणि यातना यांना कारणीभूत ठरल्याबद्दल जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने (मध्य मुंबई) यांनी 'व्होडाफोन-आयडिया'ला दोषी ठरविले.

मुंबईतील रहिवासी असलेल्या तक्रारदाराने २ मे २०१९ पासून २८ दिवसांसाठी त्यांच्या मोबाइल नंबरवर आंतरराष्ट्रीय रोमिंग सेवा घेतली होती. त्यात अनलिमिटेड इनकमिंग आणि आउटगोइंग कॉल्स, तसेच ५.२ जीबी डेटाचा समावेश होता. केनियाला पोहोचल्यानंतर तक्रारदाराने प्लॅनचा वापर करणे सुरू केले. त्यांनी ७५ टक्के डेटा वापरला. झिम्बाब्वे येथील व्हिक्टोरिया येथे तक्रारदाराने भेट दिली.

पान २ वर

## थोडक्यात

### काच कारखान्यातील दुर्घटनेप्रकरणी मालकासह ५ जणांवर गुन्हा दाखल

पुणे : येवलेवाडी येथील इंडिया ग्लास सोल्युशन या काच कारखान्यात रविवारी झालेल्या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी मालकासह पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे. कारखना मालक हुसेन तय्यबअली पिठावाला (वय ३८, रा. श्री ज्वेलर्स सोसायटी, टिळेकरनगर), कारखाना मालक हातीम हुसेन मोटारवाला (वय ३६, रा. टिळेकरनगर), गाडीमालक संजय धुळा हिरवे (वय ३४, रा. कळंबोली), कॉन्ट्रक्टर बबन ऊर्फ सुरेश दादु चव्हाण, गाडीचालक राजु दशरथ रासगे (वय ३०, रा. कळंबोली) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत दयानंद ज्ञानदेव रोकडे (वय ३६, रा. शिवसृष्टी अपार्टमेंट, येवलेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. काच उतरवणारे कामगार यांना कोणतीही सुरक्षा सामग्री अगर व्यवस्था पुरवली नाही.

### 'सरकारच्या भरवशावर राहू नका, सरकार ही विषकन्या', नितीन गडकरींचे विधान चर्चेत

नागपूर : केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे रोखठोकपणे अनेकदा राजकारण्यांसह अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावताना पाहायला मिळतात.दरम्यान गडकरी यांनी केलेल्या विधानाची चर्चा सुरु आहे. नागपूरमध्ये आयोजित 'ॲडवॅनटेज विदर्भ' या उद्योजकांसाठीच्या कार्यक्रमात बोलताना नितीन गडकरींनी विदर्भातील उद्योजक आणि गुंतवणूकदारांना एक महत्त्वपूर्ण सल्ला दिला. 'सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केल्यामुळे त्यांनाही अनुदानाचे पैसे त्या योजनेसाठी द्यावे लागत आहेत.

### 'आनंद दिघेंच्या अपघाताआधी उद्धव ठाकरेंनी त्यांचा राजीनामा मागितला होता', रामदास कदमांच विधान

मुंबई : मागील दोन दिवसांपूर्वी माध्यमांशी बोलताना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी खळबळजनक दावा केला होता. 'आनंद दिघे यांना मारले गेले आहे. त्यांचा घात झाला आहे. हे सर्व ठाण्याला माहिती आहे', असे वक्तव्य त्यांनी केले होते. आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर विरोधकांना अडचणीत आणण्यासाठी आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. दरम्यान आता रामदास कदम यांनीही मोठा गौप्यस्फोट केला आहे.

### नाशिकमध्ये मनसेचा थेट मनपा अधिकाऱ्यांना घेराव

नाशिक : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची नाशिक महापालिकेत सत्ता असताना त्यांनी नाशिकमध्ये भव्य बाळासाहेब ठाकरे स्मारक, शस्त्र संग्रहालयाची निर्मिती केली होती. दिवंगत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी अनेक शिवकालीन शस्त्र या संग्रहालयात ठेवण्यासाठी दिली होती. त्यानंतर दिवसातच या शस्त्र संग्रहालयाची दुरवस्था झाली होती. मात्र आता संग्रहालयावरून वाद पेटला आहे. त्यातच दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाशिक दौऱ्यावर आले होते. यावेळी शिवसेनेने याच संग्रहालयाचे नव्याने उद्घाटन केले. यावरून मनसे चांगलीच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून महापालिकेच्या अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला.तर या ठिकाणी राज ठाकरे यांचं नाव असलेली कोनशिला काढण्यात आल्याचा आरोप देखील मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

## सांडपाण्यामुळे पर्यावरणाची हानी झाल्याने ठाणे महापालिकेला १०२.४ कोटींचा दंड



● ठाणे, रोहित जैसवार :

देसाई खाडीच्या हद्दीत येत असलेल्या उल्हास नदीच्या पात्रात प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ठाणे महापालिकेला तब्बल १०२.४ कोटी नुकसान भरपाई देण्याचे आदेश पुणे हरिद लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिले आहेत. पर्यावरणीय हानीसाठी ही दंडाची रक्कम ठाणे महापालिकेला भरावी लागणार आहे. मुंब्रा येथील सामाजिक कार्यकर्ते आरिफ इराकी यांनी यासंदर्भात हरिद लवादाकडे दाद मागितली होती. शुक्रवार (दि.27) रोजी यासंदर्भात सुनावणी झाली असून सुनावणीमध्ये हरिद लवादाने हे आदेश दिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते आरिफ इराकी यांनी मुंब्रा येथून उल्हास नदी आणि देसाई खाडीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे होणारे गंभीर जलप्रदूषण आणि आरोग्याच्या समस्यांबाबत हरिद लवादाकडे अर्ज केला होता. ठाणे महानगरपालिकेच्या म्हणण्यानुसार, मुंब्रा येथे दररोज 35 दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाणी तयार होते, त्यापैकी 30 एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. दरम्यान, खाजगी संकुलातील 10 लहान सांडपाणी प्रक्रिया केंद्रांद्वारे (STP) 1.5 एम.एल.डी पाण्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे पालिकेचे म्हणणे आहे.

पान २ वर

## मुंबई शहरातील 'महालक्ष्मी यात्रे'निमित्त बेस्ट उपक्रमाच्या अतिरिक्त बस सेवा

● मुंबई, भावना जैन :



मुंबई शहरातील 'महालक्ष्मी यात्रा' ही प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही ऑक्टोबर महिन्यात आयोजित करण्यात येणार आहे. ही यात्रा ३ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर या कालावधीत सुरू असेल. महालक्ष्मी यात्रेदरम्यान 'महालक्ष्मी'च्या दर्शनासाठी प्रचंड संख्येने येणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमातर्फे मुंबई उपनगरातून तसेच भायखळा, महालक्ष्मी रेल्वेस्थानक येथून महालक्ष्मीदरम्यान विशेष बसगाड्या सोडण्यात येणार आहेत. शहराच्या विविध भागांतून महालक्ष्मी मंदिरामार्गे प्रवर्तित होणाऱ्या बसमार्गावरील बसफेऱ्यांमध्ये देखील आवश्यकतेप्रमाणे वाढ करण्यात येईल. महालक्ष्मी मंदिराला भेट देणारे प्रवासी मोठ्याप्रमाणावर भायखळा स्थानक व महालक्ष्मी स्थानक येथे लोकलने येऊन तेथून बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांचा वापर करतात. त्यामुळे या मार्गावर बेस्ट उपक्रमाच्या जास्तीत जास्त बसगाड्या भायखळा, महालक्ष्मी स्थानक ते महालक्ष्मी मंदिर या दरम्यान चालवण्यात येतील. भक्तांना मार्गदर्शन करण्यासाठी बस निरीक्षक आणि वाहतूक अधिकाऱ्यांची बस स्थानकावर नियुक्ती करण्यात येणार आहे.

महालक्ष्मी यात्रेदरम्यान बेस्ट बसमार्ग ३७, ५७, १५१, ए-६३, ए-७७, ए-७७ जादा, ए-३५७, ८३ या बसमार्गावर दररोज २३ अतिरिक्त बसगाड्या चालवण्यात येतील. या व्यतिरिक्त लोकल प्रवाशांसाठी प्रबोधनकार ठाकरे उद्यान (शिवडी) येथून महालक्ष्मी मंदिरात जाण्याकरीता गर्दीच्यावेळी लालबाग, चिंचपोकळी व महालक्ष्मी रेल्वे स्थानकमार्गे नवरात्रीच्या ९ दिवसांच्या कालावधीत विशेष बससेवा चालवण्यात येतील.

पान २ वर

## पुण्यातील महानगर पालिकेने बेकायदा मशीद आणि मदरशांवर केली बुलडोझरची कारवाई

● पुणे, अभिजीत येरल्लू :



देशातील अनेक राज्यांमध्ये सध्या बेकायदा मशिदींबाबतचा गदारोळ वाढत आहे. आता पुण्यातील बेकायदा मशीद आणि मदरशांवर बुलडोझरची कारवाई करण्यात आली आहे. महानगर पालिकेने काल मध्यरात्री बेकायदा बांधकामांवर ही कारवाई केली आहे.

पुण्यातील पिंपरी चिंचवडमधील सर्व बेकायदा धार्मिक स्थळे पाडण्यात यावीत, असे उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेची ही कारवाई झाली आहे.

सहा महिन्यांपूर्वी अशा सर्व बेकायदा बांधलेल्या धार्मिक स्थळांना महानगरपालिकेने नोटीसही पाठवली होती, मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यानंतर आता महानगर पालिकेने कारवाई सुरु केली आहे. मशीद आणि मदरशावर बुलडोझरच्या कारवाईला तेथील मुस्लिमांचा तीव्र विरोध आहे. रविवारी रात्री ही मशीद वाचवण्यासाठी मुस्लिम समाजातील लोक मोठ्या संख्येने तेथे पोहोचले. दुसरीकडे, परिस्थिती चिघळू नये म्हणून प्रशासनाने मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. आंदोलनादरम्यान पोलिसांनी मुस्लिम समाजातील काही जबाबदार नेत्यांनाही ताब्यात घेतले, ज्यांना पहाटे 5 वाजता सोडण्यात आले.

पान २ वर

## अवैध दारुधंद्याच्या विरोधात दिघी कोळीवाड्यातील महिला आक्रमक



● रायगड, विशाल पाटील :

दिघी कोळीवाड्यातील कोळी समाजाच्या महिलांनी अवैद्य दारूचे धंदे बंद करावे अशी मागणी केली आहे. यासाठी एकत्र येत समाज कमिटीकडे तक्रार केली आहे.

कोळीवाडा हद्दीतील अवैद्य दारूचे धंदे बंद झाले नाही तर पंचक्रोशीतील जन आक्रोश आंदोलन करू असा इशारा दिला आहे. मागील काही वर्षांपासून ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय दिघी गावामध्ये खुलेआमपणे विनापरवाना दारू विक्री सुरू असल्याचे गावातून नागरिकांकडून , विशेषता महिलांकडून बोलले जात आहे.

पान २ वर

## किमान देवांना तरी राजकारणापासून दूर ठेवा"- सर्वोच्च न्यायालय

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



तिरुपती देवस्थानाच्या प्रसादासंदर्भात चालू असणारा वाद राजकीय मुद्दा होऊ लागला आहे. आधी विद्यमान मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनीच आधीच्या सरकारच्या काळात प्रसादाच्या लाडूंसाठी भेसळयुक्त तूप वापरलं जात होतं असा खळबळजनक आरोप केला. त्यानंतर वायएसआरसीपी अर्थात आंध्र प्रदेशातील आधीच्या सत्ताधारी पक्षाकडून हे आरोप फेटाळण्यात आले. त्यावरून आता एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण चालू झालं आहे. यासंदर्भात न्यायालयानं सुनावणीदरम्यान गंभीर भाष्य केलं. तसेच, पुढील सुनावणी तीन तारखेला ठेवली आहे. न्यायमूर्ती बी. के. गवई व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी चालू आहे. यावेळी न्यायालयाने "किमान देवांना तरी राजकारणापासून दूर ठेवा अशी अपेक्षा आम्ही करतो", अशी टिप्पणी केली. "हा श्रद्धेचा विषय आहे. जर भेसळयुक्त तूप वापरलं गेलं असेल, तर ते अजिबात स्वीकारार्ह नाही", असा युक्तिवाद सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयासमोर केला. तुषार मेहता यांच्या युक्तिवादावर न्यायमूर्तींनी यासंदर्भातल्या पुराव्याची मागणी केली. "प्रसादाचे लाडू तयार करण्यासाठी भेसळयुक्त तूप वापरलं गेलं होतं, याचा काय पुरावा आहे?" अशी विचारणा यावेळी न्यायालयाने केली. पुराव्यादाखल प्रयोगशाळेत झालेल्या तपासणीच्या अहवालाचा संदर्भ देण्यात आला आहे. मात्र, न्यायालयाने यासंदर्भात सविस्तर टिप्पणी केली आहे. "प्रसादाचे लाडू तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या तुपामध्ये भेसळ असल्याचा निष्कर्ष ज्या अहवालाच्या आधारे काढण्यात आला आहे, त्या अहवालावरून असं स्पष्ट होत आहे की अहवालासाठीचे नमुने गोळा करण्यात आलेला तुपाचा साठा प्रसाद बनवण्यासाठी वापरलाच गेलेला नाही", असं न्यायालयाने यावेळी नमूद केलं.

पान २ वर

## नव्या पोर्टलच्या तांत्रिक त्रुटीमुळे वसई -विरार मधील जन्म-मृत्यू दाखले प्रलंबित

● विरार, सुचिता देशमुख :

जन्म मृत्यूचे दाखले काढण्यासाठी जुलै पासून सुरू करण्यात आलेल्या नव्या नागरी नोंदणी पोर्टलमध्ये (सीआरएस) असलेल्या तांत्रिक त्रुटींचा फटका बसू लागला आहे. त्यामुळे मागील 3 महिन्यांपासून शहरातील हजारो नागरिकांचे जन्म आणि मृत्यूचे दाखले प्रलंबित आहेत. हा तांत्रिक दोष दूर करण्यासाठी पालिकेकडून केंद्र आणि राज्य शासनाकडे तक्रारी करून पाठपुरावा केला आहे. वसई विरार महापालिकेने 9 प्रभागात या सीआरएस पोर्टल मार्फत दाखले देण्याची प्रक्रिया सुरू केली होती. नागरिकांनी अर्ज केल्यानंतर दोन दिवसांत दाखले मिळणे अपेक्षित असते. परंतु या तांत्रिक त्रुटीमुळे दाखले मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

पान २ वर

## दापोली, गुहागर आणि राजापुर मतदारसंघातील ठाकरे गटाचे उमेदवार निश्चित

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्याकडून रत्नागिरी जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेतला जात आहे. या जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात जवळपास उमेदवार निश्चित मानले जात आहेत. दापोली, गुहागर आणि राजापुर या जागेवर ठाकरे यांचे उमेदवार ठरले आहेत. पुढील काही दिवसात नवरात्र



उत्सव सुरू होत आहे. त्या शुभ मुहर्तावर या उमेदवारांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

शिवसेना पक्ष फुट आणि त्यानंतर एसीबीसीची चौकशी लागली तरी राजन सावळी मागे हटले नाहीत.

पान २ वर

## संपादकीय


संपादक - राकेश शंकर गोरे

# व्यापारीकरणानंतर तरी एसटीचे भले व्हावे!

राज्य मंत्रिमंडळाने पुन्हा एकदा घेतला आहे. सुमारे आठ हजार कोटींचा तोटा असलेल्या एसटी मंडळाला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य शासनापुढे हात पसरावे लागतात एवढी गंभीर परिस्थिती या मंडळाची आहे. तोटा भरून काढण्याबरोबरच एसटी मंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता मंडळाच्या मालमत्तेचे खासगीकरण करून निधी जमा करण्याची गेली अनेक वर्षे योजना आहे. एसटी मंडळाकडे ७५०च्या आसपास बस स्थानके आणि आगारांच्या जागा आहेत. व्यापारी तत्त्वावर एसटीच्या जागेचा विकास करण्याचा हा मंत्रिमंडळाने पहिल्यांदा घेतलेला निर्णय नाही. याची सुरुवात २००१ मध्ये झाली होती. पण गेल्या २३ वर्षांत त्यात फारशी प्रगती झालेली दिसत नाही. २००६ मध्ये पुन्हा धोरणात काही बदल करण्यात आले. मध्यंतरी मंडळाच्या जागांचे चलनीकरण (मॉनेटायझेशन) करून निधी उभारण्याची योजना होती. पण याही प्रस्तावाची फारशी प्रगती झालेली दिसत नाही. २०१७ मध्ये तत्कालीन परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी सर्वाधिक वर्दळीच्या १३ आगारांचा खासगीकरणातून विकास करण्याचा निर्णय घेतला, त्याचाही प्रभाव दिसलेला नाही. उलट पनवेल आगाराच्या विकासाची योजना रखडली. २०१९च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मुंबई सेंट्रल येथील मंडळाच्या मुख्यालयाचा विकास करण्याच्या कामाचे भूमिपूजन पार पडले होते. ४९ मजली इमारत उभारण्यासाठी नियोजन करण्यात आले होते. विविध सरकारी कार्यालये या इमारतीत सुरू करण्याची योजना होती. पण गेल्या पाच वर्षांत बांधकामाची एक वीटही हलली नाही. पाच वर्षांनी पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर व्यापारीकरणाचा घाट घालण्यात आला आहे.

गेल्या दोन दशकांत एसटीच्या ४५ जागांचा व्यापारी तत्त्वावर विकास करण्यात आला. त्यातून एसटी महामंडळास अधिमूल्य स्वरूपात फक्त ३२ कोटी रुपये मिळाले. २२ कोटी मूल्याचे बांधकाम करून मिळाले. खासगीकरणातून विकास झाला त्या स्थानकांची अवस्था फार काही चांगली नाही. अगदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात खोपट आगाराचे काही वर्षांपूर्वी व्यापारीकरण करण्यात आले. ठेकेदाराने विक्रीसाठी अद्यायावत इमारत उभारली, पण एसटी स्थानकाच्या जागेची दुरवस्था कायम आहे. एसटी स्थानकांची देखभाल आणि दुरुस्ती होत नाही. परिणामी अनेक स्थानकांमध्ये खड्यांचे साम्राज्य आहे. निधीची चणचण या'विकासा'नंतरही कायम असल्याने एसटी मंडळाचे हात बांधले गेलेले आहेत.

व्यापारीकरणाचा नव्याने निर्णय घेताना काही अटी व शर्ती शिथिल करण्यात आल्या आहेत. भाडेपट्ट्याचा कालावधी ३० वर्षांवरून ६० वर्षे करण्याबरोबरच एसटी मंडळाच्या भूखंडावर उपलब्ध होणाऱ्या एकूण चटईक्षेत्र निर्देशांकापैकी ०.५ टक्के वगळता उर्वरित सर्व चटईक्षेत्र ठेकेदाराला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जमिनीचा व्यापारी तत्त्वावर उपयोग करताना ५० टक्के हिस्सा शासनाकडे भरण्यापासून महामंडळास सवलत देण्यात येईल. सर्व निविदा महामंडळाच्या स्तरावरच अंतिम करण्यात येतील. यामुळे शासनाकडे होणारा फायलींचा प्रवास टळू शकेल. व्यापारीकरणात खासगी विकासकांनी भाग घ्यावा म्हणून अटी बदलल्यावर तरी व्यापारीकरणातून लाभ खरोखरच मिळतो का, हे आता बघायचे. व्यापारीकरणात खासगी विकासक स्वतःचा फायदा करून घेतात आणि शासनाला त्याचा फारसा लाभ मिळत नाही, हे अनेक विभागांमध्ये अनुभवास आले आहे. निविदा अंतिम करताना प्रवाशांच्या सोयीसुविधा तसेच आगारांमध्ये आमूलाग्र बदल होतील याची खबरदारी एसटी मंडळाला घ्यावी लागणार आहे. राज्यातील सामान्य जनतेची 'लाल परी' तोट्यातून बाहेर आणण्याचे खरे आव्हान आहे. जवळपास दहा वर्षांनंतर ऑगस्ट महिन्यात एसटी मंडळाला तब्बल १६ कोटींचा फायदा झाला. एसटी मंडळाला तेवढाच दिलासा मिळाला.



## आजची चित्रोळी

चमकून पडत्या गारा जेव्हां
निखळणारे तारे झाल्या !
शांत तलावी डुबूक डुबुक
आवाज त्या करून गेल्या !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### व्हीआय कंपनीला ग्राहक आयोगाचा दणका

हा देशही पॅकमध्ये समाविष्ट असेल, असे तक्रारदाराला वाटले. मात्र, तेथे त्याचा उपयोग झाला नाही. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, नवीन देशात प्रवेश केल्यानंतर कंपनीकडून रोमिंग दराबाबतचा मेसेज आला नाही.

अनावधानाने १२४ एमबी डेटा वापरल्यावर कंपनीने मोबाइल सेवा खंडित केली. तसेच त्यासाठी ७२ हजार ४१९ रुपये आकारले. तक्रारदार भारतात परतल्यावर सेवा पूर्ववत करण्यासह ५ जीबी मधला उर्वरित डेटा वापरण्याची परवानगीही मागितली. मात्र, कंपनीने त्यांची विनंती फेटाळली. तसेच सेवा पूर्ववत करण्यासाठी ६० हजार रुपये भरण्यास सांगितले. त्याविरोधात तक्रारदाराने ग्राहक सेवा कक्ष, नोडल अधिकारी आणि भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण (ट्राय) यांच्याकडे तक्रार केली. मात्र, त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. ४० दिवस सेवा खंडित केल्यानंतर तक्रारदाराला जीएसटीसह ८६ हजार २९० रुपये भरण्यास भाग पाडले. त्यानंतर तक्रारदाराने ग्राहक आयोगात तक्रार केली होती.

### सांडपाण्यामुळे पर्यावरणाची हानी झाल्याने ठाणे...

दिवा येथे सध्या 32 एमएलडी सांडपाण्याची निर्मिती होते. मात्र अद्याप एसटीपीची प्लांट या ठिकाणी सुरु करण्यात आलेला नाही. खाजगी संकुलांमध्ये 14 एसटीपी आहेत, जे सुमारे 5.8 एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करत आहेत. तर शिल्लक मुख्यतः सेप्टिक टाक्या आणि भिजवलेल्या खड्ड्यांमध्ये प्रक्रिया केली जात असल्याची माहिती पालिकेने दिली आहे. तर अतिरिक्त प्राथमिक प्रक्रिया केलेले पाणी जवळच्या नाल्यांमध्ये सोडले जाते.

वर्षानुवर्षे अशाप्रकारे सांडपाणी सोडण्यात येत असल्याने पर्यावरणाची हानी झाली असून ही भरपाई भरून काढण्यासाठी 102.4 कोटी रुपये दंड आकारण्यात आला आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी ठाणे महापालिकेच्या वतीने आधीच पावले उचलली आहेत हे खरे असले परंतु ते पुरेसे नाहीत. याचिका कर्त्यांच्या अर्जावर सुनावणी देताना न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंग आणि तज्ञ सदस्य विजय कुलकर्णी यांच्या खंडपीठाने शुक्रवारी (दि.27) रोजी दोन महिन्यांत बोर्डाकडे रक्कम जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

### मुंबई शहरातील 'महालक्ष्मी यात्रे'निमित्त...

महालक्ष्मी यात्रेदरम्यान बेस्ट उपक्रमातर्फे उपलब्ध असलेल्या विशेष बससेवेचा नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन बेस्ट प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### पुण्यातील महानगर पालिकेने बेकायदा मशीद...

पाडण्यात आलेली मशीद पुण्याला लागून असलेल्या पिंपरी चिंचवडमधील आहे.

साधारण 25 वर्षांपूर्वी येथे मशीद बांधण्यात आली होती, मात्र गेल्या काही वर्षांपासून अमिया येथील दारुल उलूम जामिया नावाने येथे मदरसा चालवला जात आहे. याविरोधात हिंदू संघटनांनी तक्रारी केल्या होत्या. उच्च न्यायालयानेही परिसरातील सर्व बेकायदा धार्मिक प्रार्थनास्थळे पाडण्याचे आदेश दिल्यानंतर काल रात्री महापालिकेने या बेकायदा बांधकामांवर बुलडोझर फिरवण्यास सुरुवात केली. या कारवाईत मदरसा पूर्णपणे जमीनदोस्त करण्यात आला असून, बेकायदा बांधकामामुळे मशिदीचा काही भागही पाडण्यात आला आहे.

### अवैध दारुधंद्याच्या विरोधात दिघी...

तसेच हे धंदे बंद करावे यासाठी महिलांची ग्रामपंचायतिकडे नेहमी मागणी असून याकडे गृप ग्रामपंचायत कार्यालय दिघी कडून दारू बंदी करण्यासाठी कोणीही तसे प्रयत्न केले नाहीत. विनापरवाना मद्य-दारू विक्री कायमस्वरूपी बंद करण्यासाठी पंचक्रोशीतील महिलांनी कायदेशिर , संवैधानिक मार्गाने संघटित होऊन अनेक वेळा प्रयत्न केले परंतू सदर प्रयत्नांना संबंधित शासकिय यंत्रणांकडून योग्य आणि आवश्यक सहकार्य मिळाले नाही व मिळत नाही. तसेच सदर विनापरवाना मद्य दारू विक्रीधारकांना संबंधित स्थानिक राजकिय कार्यकर्ते आणि संबंधित शासकिय यंत्रणांकडूनच प्रोत्साहन, सहकार्य मिळत असल्याची उद्विग्न भावना महिलांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित शासकिय परिपत्रकातील तरतुदींनुसार सदर विनापरवाना अनधिकृतरित्या सुरू असलेली मद्य दारू विक्री कायमस्वरूपी बंद करण्यासाठी आवश्यक सर्व कायदेशिर, संवैधानिक मार्गाचा अवलंब करून लवकरात लवकर आम्हा महिलांचे उध्वस्त होणारे संसार थांबवावे.

अंखड भारताचे उज्वल भविष्य असलेली तरूण पिढी व्यसनमुक्त करण्यासाठी शासकीय, सामाजिक स्तरावर आणि लोकप्रतिनिधी यांनी योग्य ते प्रामाणिक, निस्वार्थी प्रयत्न करून महिलांना निस्वार्थीपणे न्याय द्यावा अशी विनंती दिघी हिंदू महादेव कोळी समाजातील महिलांनी गावातील पंच कमिटी सह संबंधित शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी यांस केली आहे.

दारूमुळे आतापर्यंत अनेक महिलांचे संसार उद्धस्त झाले असून अनेक संसार उद्धस्त होण्याच्या मार्गावर आहेत. देशाचे भवितव्य असलेली तरूण पिढी व्यसनाच्या आहारी गेली असून अनेक तरूण बेरोजगार झाले आहेत. समाजातील महिलांनी आपल्या समस्यांच्या व्यथा नवनिर्वाचित पंच कमिटी कडे मांडल्या आहेत. नवनिर्वाचित पंच कमिटी ने सामजिक हिताच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शासकीय यंत्रणा, सामाजिक स्तरावर आणि लोकप्रतिनिधी यांचेकडे कायदेशिर आणि संवैधानिक मार्गाने लेखी पत्रव्यवहार करून समस्यांचे निवारण करण्याचे प्रमाणिक प्रयत्न केले जातील असे आश्वासन समाजातील महिलांना दिले आहे. शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी यांनी दारू बंदी करण्यासाठी ठोस पावले उचलून दारू बंदी न केल्यास ग्रामपंचायत, स्थानिक पोलिस ठाणे यांसह संबंधित वरीष्ठ शासकीय कार्यालयांत जन आक्रोश आंदोलन करू असा इशारा पंचक्रोशीतील महिलांनी दिला आहे.

### किमान देवांना तरी राजकारणापासून दूर ठेवा"-...

दरम्यान, यावेळी न्यायालयाने माध्यमांमध्ये या मुद्द्यावरून चालू असणाऱ्या चर्चेवरून पक्षांना सुनावलं आहे. "जर या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले होते, तर मग यासंदर्भात माध्यमांकडे जाण्याच काय आवश्यकता होती?" अशी विचारणा न्यायालयाने केली.

सर्वोच्च न्यायालयाने यावेळी केंद्र सरकारला चौकशी प्रक्रियेसंदर्भात उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य सरकारनं स्थापन केलेल्या विशेष तपास पथक अर्थात एसआयटीनं आपला तपास पुढे चालू ठेवायचा आहे की नाही? याबाबत केंद्राला विचारणा करण्यात आली आहे. येत्या ३ ऑक्टोबर रोजी या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार असून तोपर्यंत राज्य सरकारला जैसे थे स्थिती ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

### नव्या पोर्टलच्या तांत्रिक त्रुटीमुळे वसई -विरार...

एकीकडे गतीमान सरकार असा टेंभा मिरवत असते. परंतु केंद्र शासनाची संगणकीय यंत्रणा किती तकलादू आणि कुचकामी आहे, ते यावरून दिसून येत असल्याचा आरोप काँग्रेसचे कुलदिप वर्तक यांनी केला आहे. मागील 3 महिन्यांपासून दाखले मिळत नसल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहे. मृत्यूदाखले नसल्याने निवृत्तीवेतनाला अडचणी येत आहेत.

नागरिकांना जन्म मृत्यूचे दाखले महानगरपालिकांमार्फत देण्यात येतात. 2026 पासून केंद्र शासनाच्या सीआरएस म्हणजे नागरी नोंदी सिस्टिम ( सिव्हिल रजिस्ट्रेशन सॉफ्टवेअर) नावाच्या पोर्टलद्वारे हे दाखले देण्यात येऊ लागले. तो पर्यंत काही अडचण नव्हती. जुलै महिन्यापासून केंद्र शासनाने महापालिकांना अपडेटेड सीआरएस पोर्टल दिले. परंतु पहिल्या दिवसापासूनच या पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी भेडसावू लागल्या आहेत. हे पोर्टल अंत्यंत धीमे सुरू असून एक एण्ट्री करण्यासाठी एक एक तासांचा वेळ लागत आहे. एण्ट्री केल्यानंतर सुध्दा ओटीपी वेळेवर येत नाही. मध्येच हे पोर्टल बंद पडत असते. जुन्या नोंदी शोधण्यासाठी असलेले दिनदर्शिकाच खुली होत नाही. नोंद केलेल्या दाखल्यांची प्रिंट काढतांना अडचणी येत आहेत जोडाक्षरे असलेली नावे चुकीच्या पध्दतीने प्रिंट होत असतात. एवढे करूनही जरी पालिकेने नोंद केली तरी त्याच जिल्हा स्तरावरून मंजूरी येण्यासाठी भरपूर वेळ लागतो. त्यामुळे जुलै पासून कुणालाही जन्म मृत्यूचे दाखले देण्यात आलेले नाही. ही अडचण दूर करण्यासाठी केंद्र आणि राज्यकडून कुठलीही मदत पालिकेला मिळत नसल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सीआरएस पोर्टल मध्ये दोष असल्याने नागरिकांना जन्म-मृत्यूचे दाखले मिळत नाही. यासाठी पालिकेतर्फे सातत्याने राज्य आणि केंद्र शासनाकडे तक्रारी करून पाठपुरावा करण्यात येत आहे, अशी माहिती उपायुक्त (माहिती तंत्रज्ञान) समीर भूमकर यांनी दिली. लवकरात लवकर हा तांत्रिक दोष दूर करून नागरिकांना दाखले देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

### दापोली, गुहागर आणि राजापुर मतदारसंघातील...

अत्यंत कठीण काळात ते पक्षाच्यासोबत राहिलेत, त्यामुळे राजापूर विधानसभा मतदारसंघातून त्यांचं नाव जवळपास निश्चित मानलं जात आहे. तर याच मतदारसंघातून महायुतीकडून किरण सामंत कामाला लागले आहेत. मतदारसंघातील विविध भागात त्यांनी बैठकांचा सपाटा लावला आहे. त्यामुळे महायुतीकडून नेमकी कुणाला उमेदवारी मिळणार ? ते पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

गुहागर मतदारसंघात विद्यमान आमदार भास्कर जाधव यांना पुन्हा उमेदवारी देण्यात येणार आहे. मात्र त्यांचे पुत्र विक्रांत जाधव यांनी मध्यंतरी अजित पवार यांची भेट घेतली होती. त्यावर भास्कर जाधव यांनी स्पष्टीकरण दिलं होतं. परंतु त्या जागेवरूनही सस्पेस कायम आहे. भास्कर जाधव यांच्याविरोधात श्रीकांत शिंदे यांचे मेहुणे विपुल कदम यांना उमेदवारी मिळावी, यासाठी शिवसेना शिंदे गटाकडून प्रयत्न सुरू आहेत. अलीकडेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत एक बैठक पार पडली. त्या बैठकीत विपुल कदम यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तेब झाल्याचे समजत आहे.

दुसऱ्या बाजूला शिवसेना शिंदे गटाचे आमदार असलेल्या दापोली विधानसभा मतदारसंघात योगेश कदम यांच्याविरोधात संजय कदम यांनी विधानसभेसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. अलिकडेच संजय कदम यांनी राष्ट्रवादीतून ठाकरे गटात प्रवेश केला आहे. काही दिवसापासून संजय कदम आणि योगेश कदम यांच्यात वाद सुरू झाले आहेत. त्यामुळे येथील निवडणूक अतिशय अटीतटीची होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# ११ क्षेत्रांतील मान्यवरांचा सुवर्णरत्न सन्मान पुरस्काराने गौरव!

## चतुरंग प्रतिष्ठानच्या सुवर्ण महोत्सव सांगता सोहळा संपन्न !

**मुंबई, (राकेश गायकवाड) :** माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरामध्ये चतुरंग प्रतिष्ठानचा दिमाखदार सुवर्ण महोत्सव सांगता सोहळा रंगला. अतिशय देखणा असा हा सोहळा पाहण्यासाठी रसिकांनी प्रचंड गर्दी केली होती. पुरस्कार सोहळ्याला मनोरंजनपर कार्यक्रमाची जोड दिल्याने हा सोहळा अधिकच रंगतदार ठरला. प्रेक्षकांनी या सोहळ्याला भरभरून दाद दिली. सोहळ्याच्या पहिल्या दिवशी चतुरंगचे दिवंगत पायाभरणीकर असलेले स्व. गणेश सोळंकी, स्व. प्रफुल्ला डहाणूकर, स्व. विनोदभाई दोशी, स्व. एस. वाय. गोडबोले गुरुजी, स्व. विद्याधर गोखले(अण्णा), श्री. रमेशभाऊ महाजन यांच्या कार्याला कृतज्ञ वंदन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी 'चतुरंग सुवर्णरत्न सन्मान' समारंभ पार पडला. यामध्ये पं. उल्हास कशाळकर (गायन), पं. हरिप्रसाद चौरसिया (वादन), अशोक पत्की (संगीत दिग्दर्शन), महेश एलकुंचवार (साहित्य), दिलीप प्रभावळकर (नाटक), रोहिणी हट्टंगडी (चित्रपट), वासुदेव कामत (चित्रकला), चंदू बोर्डे (क्रीडा), डॉ. अनिल काकोडकर (संशोधन) बाबासाहेब कल्याणी (उद्योजकता), मेजर महेश कुमार भुरे (राष्ट्रीय सुरक्षा) या ११ क्षेत्रांतील नामवंत गुणवंतांच्या कारकिर्दीला 'चतुरंग सुवर्णरत्न सन्मान' प्रदान करून सलाम करण्यात आला. या सोहळयाला ॲड. उज्वल निकम, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. यावेळी जेष्ठ अभिनेते राजदत्त, मोहन जोशी, मनोज जोशी, अशोक समेळ, दीपक करंजीकर, सुहास बहुळकर, जे बी जोशी, एअरमार्शल हेमन भागवत, विजय केंकरे, मृदुला दाढे जोशी, मिलिंद जोशी, देवकी पंडित, श्रुती भावे चितळे, डॉ सागर देशपांडे, विठ्ठल कामात, उदय देशपांडे आदी मंडळी उपस्थित होती. डॉ. मोनिका गजेंद्रगडकर यांनी महेश एलकुंचवार यांच्या वतीने, तर गणेश चंदन यांनी बाबासाहेब कल्याणी यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. मेजर महेश कुमार भुरे यांना पुरस्कार प्रदान करताना त्यांना रसिकांनी उभे राहून मानवंदना दिली. पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना प्रभावळकर म्हणाले की, वसंत कानेटकर यांच्या नावाचा पुरस्कार हा त्यांचा आशीर्वाद समजतो. आजवरच्या कारकिर्दीतील सर्व सह कलाकारांच्या वतीने पुरस्कार स्वीकारतो. तसेच सर्व नाटककाराना कृतज्ञातपूर्वक अर्पण करतो. लेखक असल्याने नि:शब्दतेतील बोलकेपणा समजतो असे म्हणत कधीच दिग्दर्शकाच्या कामात व्यत्यय आणत नसल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, मी लेखक आणि अभिनेता असल्याने लेखकाला काय म्हणायचे ते समजून घेता येते. व्यक्तिरेखेची



तयारी करण्याबाबत सांगायचे तर वाचिक अभिनयातून गंगाधर टिपरे सापडले. अलबत्या गलबत्या मधील चेटकीण रंगभूषेतून समजत गेली. तयारीने रोल करायला आवडतात. झपाटलेलामधील तात्या विंचू सहजपणे करता आला, तर चौकट राजाधील रोल दबावाखाली केल्याचेही त्यांनी सांगितले. दिग्दर्शक विजय केंकरे यांनी दिलीप प्रभावळकर यांना प्रश्न विचारून दिलखुलास संवाद साधला. माझा पुढचा जन्म महाराष्ट्रात व्हावा अशी इच्छा व्यक्त करत पंडित हरिप्रसाद चौरसिया म्हणाले की, इतकी वर्षे महाराष्ट्रात राहात असल्याने अलाहाबादमध्ये जन्मल्याचे विसरून गेलो. मी इथे का नाही जन्मलो असा प्रश्न नेहमी पडतो. माझा पुढचा जन्म महाराष्ट्रमध्ये व्हावा, असा रसिकांनी आशीर्वाद द्यावा असेही ते म्हणाले. प्रसिद्ध शास्त्रज्ञ ज्येष्ठराज जोशी काकोडकर यांना उद्देशून म्हणाले की, डॉ. काकोडकर आपल्या देशाचे 'ओपनहायमर' आहेत. काकोडकर म्हणाले की, चतुरंगसारखी संस्था सर्वांगीण कामे करत आहे. प्रत्येकाला आपली जागा दाखवण्याचे काम ही संस्था करत असल्याचेही ते गंमतीने म्हणाले. देवकी पंडित यांनी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्याबद्दल गौरवोद्गार काढत म्हणाल्या की, अशोक पत्की यांच्या संगीतात अभिजात संगीताचे बीज असल्याचे जाणवते. त्यामुळेच त्यांच्या संगीतरचना अजरामर होतात. राग संगीताचे भावविश्व त्यांच्या छोट्याशा रचनेतही पाहायला मिळते असेही त्या म्हणाल्या. यासोबतच देवकी यांनी आभाळमाया या गाजलेल्या मालिकेच्या शीर्षकगीताचे सुरेल सूर छेडले. चतुरंग च्या चतुर रसिकांनी त्यांना उत्स्फूर्तपणे दाद दिली.

ॲड. उज्ज्वल निकम यांनी आपल्या अनोख्या वकिली शैलीत संवाद साधत रसिकांची मने जिंकली. ते म्हणाले की, वकिलाला भाषणाची आणि फुकट बोलायची सवय नसते, पण महनीय व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी इथे आल्याचे उज्ज्वल निकम म्हणाले. इथे आल्याने आपणही चतुरंग बनल्याचेही ते म्हणाले.

विनोद तावडे यांनी पुरस्कार विजेते सर्व देव माझ्या पाठीशी होते अशी भावना व्यक्त केली. इथले चांगले ते घेऊन जाणार आहे. चतुरंगपासून कधीच दूर जाणार नाही. तरुण प्रेक्षकांची गती वाढविण्याकडे लक्ष द्यायला हवे असेही त्यांनी सूचित केले. डिजिटलचा अवलंब करायला हवा आणि चतुरंग आता दिल्लीत व्हायला हवा असेही ते म्हणाले.

चित्रपटांची निवड करताना आपण फारशी चुझी बनत नसल्याचे रोहिणी हट्टंगडी म्हणाल्या. छोटे पण चांगले रोल्स केले. नाटकांमध्ये माझ्यासाठी असलेलेच रोल ऑफर करण्यात आले. आपण दिग्दर्शकाची अभिनेत्री असल्याचे मान्य करते असे त्या म्हणाल्या. जयदेव यांनी कधीच मला दिग्दर्शक म्हणून काही सूचना दिल्या नाहीत असेही रोहिणी म्हणाल्या.

या सोहळ्याच्या पहिल्या दिवशी अभिनेत्री-नृत्यांगना शर्वरी जमेनीसने नृत्यवंदना देत अर्घ्य सादर केले. सौमित्र पोटेने 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील कलाकारांची मुलाखत घेतली. यात सचिन गोस्वामी, सचिन मोटे, पृथ्विक प्रताप, रोहित माने, शिवाली परब यांनी सहभाग घेतला. दुसऱ्या दिवशी कविवर्य कुसुमाग्रज आणि नाटककार वि. वा. शिरवाडकर समोरासमोर आले तर त्यांच्यामध्ये कशा प्रकारच्या गप्पा रंगू शकतात याची झलक दाखवणारा 'हा सूर्य... हाच चंद्र!' नाट्य प्रयोग सादर करण्यात आला. सौ. धनश्री लेले यांनी लिहिलेल्या आणि दिग्पाल लांजेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या प्रयोगात अजय पूरकर आणि दीपक करंजीकर यांनी काम केले. प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे यांच्या आवाजात रसिकश्रोत्यांमध्ये लोकप्रिय असलेल्या सर्व प्रकारच्या गाण्यांची 'ओठांवरची आवडती गाणी' ही संगीत मैफल रंगली.

**प्रसिद्धी जनसंपर्क : राम कोंडीलकर (राम पब्लिसिटी)**
**मो. / WhatsApp :** ८०८०८२२३८५
**ई-मेल :** rampublicity@gmail.com

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या पूर्वतयारीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक संपन्न

**ठाणे (रोहित जैसवार ) :** ठाणे शहरात कासारवडवली येथील वालावलकर मैदान येथे होणाऱ्या मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवार, दि.5 ऑक्टोबर 2024 रोजी उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान यांच्या या दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी पूर्वतयारीची बैठक आज सोमवार, दि.30 सप्टेंबर रोजी ठाणे महापालिका मुख्यालय येथे झाली.

सुमारे 40 हजार नागरिकांची उपस्थिती या कार्यक्रमास अपेक्षित असून ठाणे तसेच आसपासच्या महापालिकांमधून सुमारे 1200 बसगाड्यांची ये-जा घोडबंदर रोड परिसरात होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा नियोजित दौरा शनिवार, 5 ऑक्टोबर 2024 रोजी होणार आहे. या दौऱ्यासाठी आवश्यक सर्व व्यवस्थांचे नियोजन करण्यासाठी विविध जबाबदाऱ्यांची निश्चिती करण्यात आली आहे. त्यानुसार, पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी ठाणे महापालिका मुख्यालय येथे बैठक झाली. या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महाराष्ट्र मेट्रो रेल महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, उपनगर अभियंता शुभांगी केसवानी, पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे,



उपायुक्त (समाजविकास) अनघा कदम, उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी विकास गजरे, ठाणे प्रांताधिकारी उर्मिला पाटील, एमएमआरडीए, महामेट्रो अशा विविध महत्त्वाच्या विभाग/कार्यालयांचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

पावसाळ्याचे दिवस लक्षात घेवून मुख्य सभामंडप, पार्किंग व्यवस्था येथील सर्व नियोजन करण्यात यावे. त्याचबरोबर वीज पुरवठा, इंटरनेट सेवा यांची पर्यायी व्यवस्थाही उपलब्ध करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी यावेळी दिल्या. तसेच, या काळात मोठ्या प्रमाणावर वाहतूक होणार असल्याने वाहतुकीसाठी बंद होणारे रस्ते, सेवा रस्त्यांच्या वापराची स्थिती आदींबाबत नागरिकांना अवगत करण्यात यावे, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले.

मुख्य सभामंडप, हेलिपॅड, गाड्या आणि बसेस पार्किंग व्यवस्था, वीज पुरवठा, सीसीटीव्ही नेटवर्क, जोड रस्ते यांच्या सद्य:स्थितीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. बसगाड्यांची पार्किंग व्यवस्था, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे प्रवास मार्ग आदींबाबत या बैठकीत पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी सादरीकरण केले.

सुमारे 1200 बसगाड्यांच्या पार्किंगचे नियोजन महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. त्या जागा ताब्यात घेण्यात आल्या असून त्यांचे सपाटीकरण आदी कामे करण्यात येत असल्याची माहिती नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांनी दिली. तर, मुख्य सभामंडप आणि हेलिपॅड यांच्या व्यवस्थेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांनी माहिती दिली. या बैठकीनंतर उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळाचीही एकत्रित पाहणी केली.

## नाणी संग्रहालयात रंगले ऐतिहासिक कवी संमेलन




**पुणे (शकिल शेख )-** साहित्य सम्राट पुणे संस्थेचे १९२ वे कविसंमेलन वारसा स्वराज्याचा नाणी संग्रहालय दिवेघाट, हडपसर सासवड रोड येथे माननीय विनोद ताम्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केले होते. अखिल मराठी मनांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास वंदन करून कवी संमेलनाची सुरुवात झाली. साहित्य सम्राट संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोदजी अष्टुळ यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. साहित्य सम्राट संस्था स्थापनेचा उद्देश आणि ध्येय सांगत असताना त्यांनी संस्थेच्या साहित्य आणि समाज उपयोगी बारा उपक्रमांची माहिती दिली. नाणी संग्रहालयाविषयी कौतुक करताना ते म्हणाले की त्या त्या वेळेची भाषा आणि नाणी हे ऐतिहासिक संशोधनाचे प्राथमिक स्त्रोत आहेत. त्यामुळे हा अमूल्य ठेवा जपणे आपले आद्य कर्तव्य आहे. पुढे अष्टुळ यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या प्रबोधनात्मक अभंगाची आठवण करून दिली.

**जिभेवरी तावा | सर्वासुखदाता |**
**पाणी, वाणी, नाणी | नासू नये ||**

यावेळी कवी संमेलनाच्या विचारपीठावर नाणी संग्रहालयाचे संग्राहक निर्माते विशाल जगताप, कार्यक्रमाचे निवेदक बबन चखाले, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ आणि कवी संमेलनाध्यक्ष विनोद ताम्हाणे उपस्थित होते.

स्वराज्याचा वारसा या नाणी संग्रहालयात ऐतिहासिक जागतिक नाण्यांचे ज्ञान घेत असताना आपल्या महापुरुषांच्या लेखणीचा वारसा सुद्धा आपण लक्षात घेतला पाहिजे. आपली लेखणी त्या महापुरुषांप्रमाणे समाज उपयोगी व्हावी. मी पहिली कविता सादर केली ती साहित्य सम्राट कवी संमेलनामध्येच आणि आज सर्व ज्येष्ठ साहित्यिकांसमोर मला माझ्या जीवनात पहिल्यांदा कवी संमेलन अध्यक्षांचा मान मिळाला. तो ही साहित्य सम्राट मुळेच.

या १९२ व्या कवी संमेलनामध्ये अनेक दिग्गज कवींनी विनोदापासून प्रबोधनापर्यंतच्या विविध रसातील काव्यरचनांनी संग्रहालयातील रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

निसर्ग सौंदर्याची आणि सीमेवरील शूर सैनिकांची उत्कृष्ट संबंध दाखवणारी कविता ज्येष्ठ कवी शाम लाटकर यांनी सादर केली ते म्हणतात

**तो कुर्बानी देई सौख्याची, तो घेई काळजी स्वातंत्र्याची**
**तो घालूनच डोळ्यात तेल, इंच इंच सीमा लढवेल**
**का गर्वाने अंतरा फुलला घननिळा बरसुन गेला**
**का श्रावण अजून बोला घननिळा बरसून गेला**

यानंतर विदर्भातील कवी प्रवीण वानखडे आपल्या कवितेतून सुखदुःखाविषयी म्हणतात-

**शैली कुठली असली तरी भाषा अगदी सरळ आहे**
**कुठे सुखाचे अमृत तर कुठे दुःखाची गरळ आहे**

पुढे खलील शेख यांनी वास्तवावर विचार करायला लावणारी भारदस्त कविता सादर केली ते म्हणतात –

**कोवळ्या कळीचा तो काय दोष होता?**
**मुलगी म्हणून जन्मली का तिचा गुन्हा होता?**

लगेचच ज्येष्ठ कवी दत्तू ठोकळे मानवतावादी विचार सांगणाऱ्या रचनेत म्हणतात –

**हा अजून गेला नाही मीपणाच माझ्या मधला**
**मी माणूस शोधत आहे इथे माणसा मधला**

शेवटी विनोद अष्टुळ ऐतिहासिक आणि वास्तवदावर विचार करायला लावणारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील क्रांतिकारी विचारांची कविता सादर केली. त्यात ते म्हणतात –

**शिवाजी राजे तुम्ही पुन्हा जन्मास यावे**
**तलवारीने सरळ आमचे शीर छाटावे**

अशा एकापेक्षा एक दर्जेदार काव्यरचनांनी वारसा स्वराज्याचा संग्रहालय दणाणून सोडणारे

जेष्ठ कवी गझलकार बबन धुमाळ, दत्तू ठोकळे, श्याम लाटकर, किशोर टिळेकर, सूर्यकांत नामुगडे, विनोद अष्टुळ, बबन चखाले, खलील शेख, प्रवीण वानखडे, राजेश कुंजीर, प्राजक्ता ताम्हाणे, प्रेम ताम्हाणे, मनीषा जगताप अशा कवी कवयित्रींनी रसिक प्रेक्षकांच्या टाळ्यांनी सभागृह दणाणून सोडले.

कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन बबन चखाले यांनी तर सर्व नाणी संग्रहालयाची माहिती आणि आभार संग्रहालयाचे निर्माते विशाल जगताप यांनी व्यक्त केले.

## स्वच्छतेची सुरुवात स्वत: पासूनच करावी – केडीएमसी आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़

### शालेय विद्यार्थ्यांसाठी घनकचरा जनजागृती व पर्यावरण चित्रपट महोत्सवाचे आयोजन

**कल्याण (विवेक गुंजाळ) :** स्वच्छतेची सुरुवात स्वत: पासूनच करावी, असे आवाहन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी आज केले. "स्वच्छता ही सेवा" या अभियानांतर्गत महापालिका व पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण मधील शालेय विद्यार्थ्यांसाठी घनकचरा जनजागृती व "पर्यावरण चित्रपट महोत्सव 2024" चे आयोजन प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिर येथे करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे आवाहन केले.




आपल्या घरी व आपल्या आजूबाजूला देखील स्वच्छता राखण्याबाबत विद्यार्थ्यांनी स्वत:हून पुढाकार घेवून जनजागृती केली, तर आपल्या परिसर, आपले शहर स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होईल. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येकाने रिड्यूस,रियूज, रिसायकलचा अवलंब करावा असेही त्या पुढे म्हणाल्या. या कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छतेची शपथ घेवून करण्यात आली. तद्नंतर उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना जैवविविधतेचे अनोखे दर्शन घडविणा-या जनजागृतीपर लघुचित्रफिती दाखविण्यात आल्या.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी घरगुती घातक कचरा, सॅनेटरी कचरा, प्लास्टीक कचरा, सुका कचरा व ओला कचरा म्हणजे काय ? तो कसा व कशासाठी वेगळा करणे आवश्यक आहे याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण करुन विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले आणि विद्यार्थ्यांमध्येही घनकचऱ्याबाबत जनजागृती केली.

## मुंबई विद्यापीठाच्या 'युथ फेस्टिवल' मध्ये एसएसटी महाविद्यालयाची मोहोर



**कल्याण (गणेश बागडे) :** मुंबई विद्यापीठाच्या ५७ व्या युथ फेस्टिवल प्राथमिक फेरीत एसएसटी महाविद्यालयाच्या संजीवनी सांस्कृतिक विभागाच्या स्पर्धकांनी आपल्या विविध कलागुणांचे अप्रतिम प्रदर्शन करत अनेक बक्षिसे पटकावली. त्यापैकी प्राथमिक फेरीत एसएसटीयन समाधान बागुल याने ऑन द स्पॉट पेंटिंग, व्यंगचित्र आणि पोस्टर मेकिंग स्पर्धेत पारितोषिक पटकावून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. नुकत्याच झालेल्या अंतिम फेरीचे निकाल हि जाहीर झाले असून त्यात देखील समाधान याने उत्तम कामगिरी बजावली आहे. कार्टूनिंग म्हणजेच व्यंगचित्र गटात त्याने रौप्य पदक मिळवले, तर ऑन द स्पॉट पेंटिंग या स्पर्धेत कांस्य पदक पटकावून त्याने आपले कौशल्य पुन्हा एकदा सिद्ध केले. पोस्टर मेकिंग स्पर्धेत देखील समाधान याला उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले आहे. या निकालातून अंतिम फेरीत दाखल झालेल्या स्पर्धकांनी पुन्हा जिंकण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे दिसून येत आहे. महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे प्रोत्साहन आणि सहकार्य असल्याने सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी आपल्या कलागुणांना वाव देत विविध स्तरांवर यश संपादन करत आहेत.

## विक्रीसाठी आणलेल्या तूप व बटर साठ्यावर जप्तीची कारवाई

**कल्याण (यश सावंत ) :** अमूल तूप आणि अमूल बटर चा व्यवसाय करणा-यांवर महानगरपालिकेच्या बाजार व परवाना विभागामार्फत आज धडक कारवाई करण्यात आली. मोमिन अब्दुल मुनाफ हारून रशिद, रा. निजामपुरा, भिवंडी आणि तौसिफ इकबाल काझी, रा. खडकरोड, तीनबत्ती, भिवंडी हे गफूरडॉन चौक येथे अमूल कंपनी चे तूप व बटर अवैधरित्या विक्री करीता आणणार असल्याची माहिती बाजार परवाना विभागाचे सहा. आयुक्त प्रसाद ठाकुर यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी बाजार व परवाना विभागातील प्रशांत धिवर व अन्य कर्मचारी यांना तपासणी करीता धाडले असता दोन्ही इसम हे अमूल डेअरी चे तूप व बटर विक्री करीत असल्याचे आढळून आले आहे. हारुन रशीद आणि तौसिफ काझी हे ब्रीझा गाडीतून बटर चे दोन बॉक्स (अंदाजे 30 किलो) व तूपाचे पाच बॉक्स (अंदाजे 125 किलो) घेऊन येऊन किराणा विक्रेत्यांना पुरवठा करीत असल्याचे निदर्शनास आले.

## मातोश्री महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन

**कल्याण (आकाश कांबळे) :** शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कल्याण शहर क्षेत्र समन्वयक डॉ संदेश जायभाये प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी एम मुळे यांनी जायभाये यांचे स्वागत करत कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. महाविद्यालयातील



राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. कविता मांजे यांनी राष्ट्रीय सेवा योजने संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. संदेश जायभाये यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे, राष्ट्रीय सेवा योजनेत राबविले जाणारे विविध कृती कार्यक्रम याविषयी अनमोल मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेतून संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा साधला जातो हे आपल्या मार्गदर्शनातून स्वयंसेवकांना पटवून दिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. चिंतामण भोईर व्यासपीठावर उपस्थित होते.

## अक्षय शिंदेवर अंत्यसंस्कार; उल्हासनगरातील शांतीनगर स्मशानभूमीला छावणीचे स्वरुप

**उल्हासनगर ( विशाल कारंडे ) :** शिंदेसेना व स्थानिक नागरिकांच्या विरोधानंतर बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे यांच्यावर अखेर न्यायालयाच्या आदेशानुसार उल्हासनगर शांतीनगर स्मशानभूमीत प्रचंड पोलीस बंदोबस्तात सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. शिंदेसेना व स्थानिक नागरिकांच्या विरोधकामुळे शांतीनगर स्मशानभूमी परिसरात तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलीस बंदोबस्तापुढे तणावपूर्ण वातावरण निवळे होते. उल्हासनगर कॅम्प नं-३, शांतीनगर स्मशानभूमी



मध्ये सकाळी ११ वाजता दफन करण्यासाठी एक खड्डा काहीजण खोदत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांना मिळाली.

## ऐतिहासिक वारसा जपणे सर्वांचे कर्तव्य -पालकमंत्री रविंद्र चव्हाण

**पालघर (सुचिता देशमुख) :** आपल्याला लाभलेले शौर्याचे स्मरण करून देणारे गड, किल्ले हे आपल्या देशाची अमुल्य संपत्ती असून या ऐतिहासीक वारसाला जपणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी




केले. जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, येथे शिरगांव येथील शिरगाव किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्ती कामाचे भूमिपूजन तसेच जव्हार येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामांतरण दूरदृष्य प्रणालीद्वारे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

## आदिवासींचे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उलगुलान..

**ठाणे (सुचित शिंदे) -:** राज्य सरकारने धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गात म्हणजेच अनुसूचित जमातीअंतर्गत आरक्षण देण्यासाठी समिती गठीत केली आहे. त्या निषेधार्थ तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गात धनगरांचा समावेश करू नये, या मागणीसाठी सोमवारी संयुक्त आदिवासी आरक्षण हक्क कृती समितीच्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळेस, धनगर समाजाला आदिवासी जमातींमध्ये समाविष्ट करून बेरजेचे राजकारण कराल तर आम्ही 85 मतदारसंघात वजाबाकीचे राजकारण करू, असा इशारा संयुक्त आदिवासी आरक्षण हक्क कृती समितीचे निमंत्रक अनिल भांगले, सुनील झडके आणि हंसराज खेवरा यांनी दिला. १५ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी समितीचे गठन केले आहे. या संदर्भात स्वतंत्र जी. आर.



काढण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्याविरोधात हा मोर्चा काढण्यात आला होता. सोमवारी भगवती शाळेपासून या मोर्चाला सुरूवात झाली. या मोर्चात शेकडो आदिवासी सहभागी झाले होते. गोखले रोड, राम मारुती रोड मार्गे, पु.ना. गाडगीळ ज्वेलर्स चौकातून तलावपाळी रोड, राजवंत ज्वेलर्स पासून डावीकडे गडकरी रंगायतन चौकातून उजवे वळण घेऊन चिंतामणी चौक, जांभळी नाका येथून अग्यारी रोड मार्गे टेंभी नाका येथून उजवीकडे कोर्ट नाका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पुढे राघोजी भांगरे चौक, कोर्ट नाका शासकीय विश्रामगृह येथे मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळेस मंचावर अनिल भांगले, हंसराज खेवरा , सुनील झडके, दीपक पेंदाम, रमेश परचाके, रमेश आत्राम, मधुकर तळपाडे, समीर तडवी आदी उपस्थित होते. या प्रसंगी सुनील झडके यांनी, महाराष्ट्रात भटक्या जमातींसाठक एनटी-सी हा प्रवर्ग असून त्यामध्ये केवळ धनगर या एकाच भटक्या जमातींची समावेश आहे. या प्रवर्गास ३.५% आरक्षण देण्यात आलेले आहे. उलटपक्षी एसटी प्रवर्गासाठी ७ टक्के आरक्षण असून सुमारे ४७ जातींचा समावेश त्यामध्ये आहे.

# 300 पार... रवींद्र जडेजाने कसोटीमध्ये घडवला इतिहास

## ही कामगिरी करणारा भारताचा पहिलाच फिरकी गोलंदाज



भारत आणि बांगलादेश यांच्यातील कानपूर कसोटीत भारताने बांगलादेशला २३३ धावांवर ऑल आऊट केलं आहे. पावसामुळे कानपूर कसोटीतील दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला होता. पहिल्या दिवशी ३५ षटकात ३ बाद १०७ धावा केल्यानंतर बांगलादेशने सर्वबाद होईपर्यंत २३३ धावा केल्या. मोमुनिल हकने शतक झळकावले पण इतर फलंदाजांना फार चांगली कामगिरी करता आली नाही. रवींद्र जडेजाने अखेरची विकेट घेत बांगलादेशला ऑल आऊट तर केलंच पण त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

रवींद्र जडेजाने खालीद अहमदला आपल्या गोलंदाजीवर झेलबाद केले आणि कसोटी क्रिकेटमधील ३०० वी विकेट मिळवली. या विकेटसह रवींद्र जडेजा कसोटी क्रिकेटमध्ये ३०० विकेट घेणारा भारताचा पहिला डावखुरा फिरकी गोलंदाज ठरला आहे. जागतिक क्रिकेटमध्ये, इंग्लंडच्या इयान बोथमने ७२ कसोटी सामन्यांमध्ये हा पराक्रम केला होता आणि सर्वात कमी सामन्यांमध्ये हा टप्पा गाठणारा जडेजा हा त्याच्यानंतरचा खेळाडू ठरला आहे. बांगलादेशविरुद्ध सुरू असलेला दुसरा कसोटी सामना जडेजाचा या फॉरमॅटमधील ७३वा सामना आहे.

रवींद्र जडेजा – सर्वात जलद ३०० विकेट आणि ३००० कसोटी धावा

रवींद्र जडेजाने अजून एक मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे. रवींद्र जडेजा सर्वात जलद ३०० विकेट आणि ३००० कसोटी धावा पूर्ण करणारा भारतीय ठरला. रवींद्र जडेजा हा ३०० कसोटी विकेट घेणारा सातवा भारतीय गोलंदाज आहे. त्याने १७२४८व्या चेंडूवर ३००वी विकेट घेतली. सर्वात कमी चेंडूत ३०० विकेट घेणारा तो रविचंद्रन अश्विन (१५६३६) नंतरचा दुसरा वेगवान गोलंदाज आहे.

रवींद्र जडेजाने आपल्या ७४व्या कसोटीत हा विक्रम केला. रविचंद्रन अश्विन (५४), अनिल कुंबळे (६६) आणि हरभजन सिंग (७२) यांच्यानंतर हा आकडा गाठणारा तो चौथा सर्वात वेगवान भारतीय गोलंदाज ठरला. त्याने कपिल देव (८३), झहीर खान (८९) आणि इशांत शर्मा (९८) यांना मागे टाकले. रवींद्र जडेजा आणि अश्विन ही जोडी ५४ सामन्यात ५५३ विकेट घेऊन भारताची सर्वात यशस्वी कसोटी गोलंदाज जोडी बनली आहे.

दोन्ही संघांची प्लेइंग इलेव्हन

भारत प्लेइंग इलेव्हन:

यशस्वी जैस्वाल, रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, विराट कोहली, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), केएल राहुल, रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन, आकाश दीप, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज

बांग्लादेश प्लेइंग इलेव्हन:

शादमान इस्लाम, झाकीर हसन, नझमुल हुसेन शांतो (कर्णधार), मोमिनुल हक, मुशफिकुर रहीम, शकीब अल हसन, लिटन दास (यष्टीरक्षक), मेहदी हसन मिराज, तैजुल इस्लाम, हसन महमूद, खालिद अहमद.


# ॲनिमल'साठी सर्वोत्कृष्ट खलनायकाचा पुरस्कार मिळाला अन् बॉबी देओलने पत्नीला केलं किस

अभिनेता बॉबी देओल काही काळ सिनेमांपासून दूर होता. त्याच्या करिअरमध्ये आलेल्या कठीण काळाबद्दल त्याने अनेक मुलाखतींमध्ये भाष्य केले आहे. त्याने 'रेस ३' या सिनेमातून पुनरागमन केले, त्यानंतर 'हाऊसफुल ४' आणि 'आश्रम'सारख्या वेब सीरिजमध्ये तो झळकला. बॉबी पडद्यावर दिसत होता, पण त्याला खरी लोकप्रियता 'ॲनिमल' या सिनेमाने मिळवून दिली. गेल्या वर्षी आलेल्या या सिनेमात त्याने एक शब्दही न बोलता आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. प्रेक्षकांसह समीक्षकांनीही त्याच्या अभिनयाचं कौतुक केलं आणि त्याच भूमिकेसाठी त्याला 'आयफा'मध्ये सर्वोत्कृष्ट खलनायकाचा पुरस्कार मिळाला. बॉबीने बक्षीस स्वीकारण्याआधी पत्नीबरोबर केलेल्या एका कृतीमुळे त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

यंदाचा आयफा अवॉर्ड (आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमी पुरस्कार) दुबईत संपन्न झाला. ॲनिमल सिनेमातील खलनायकाच्या भूमिकेसाठी बॉबी देओलला आयफा अवॉर्ड मिळाला हा अवॉर्ड घेण्याआधी तो भावूक झाल्याचं दिसलं.

बॉबीला आयफा सोहळ्यात सर्वोत्कृष्ट खलनायकाचा पुरस्कार जाहीर झाला आणि त्याने भावूक होत आपल्या पत्नीचा किस घेतला. या क्षणाने प्रेक्षकांनाही भावूक केले.

बॉबी पुरस्कार स्वीकारण्यासाठी मंचावर जाताच प्रेक्षकांनी मोठ्या आवाजात 'बॉबी बॉबी' असा जल्लोष सुरू केला. उपस्थितांचा उत्साह एवढा होता की बॉबीला सुरुवातीला बोलण्याची संधीच मिळाली नाही. तेव्हा बॉबी म्हणाला, "तुमच्या जल्लोषावरून असं वाटतंय की हा पुरस्कार मलाच मिळायला हवा होता." प्रेक्षकांचा आनंद यानंतरही सुरूच होता. 'ॲनिमल' सिनेमातील गाजलेल्या 'जमाल कुडू' या गाण्यावर बॉबी देओलला थिरकण्याची विनंती प्रेक्षकांनी केली. त्याने अवॉर्डची ट्रॉफी डोक्यावर घेत गाण्यावर डान्स केला आणि नंतर काचेचा ग्लास डोक्यावर ठेवत प्रसिद्ध स्टेप केली. इन्स्टाग्रामवर बॉबीने आयफा २०२४ मध्ये मिळालेल्या समर्थनाबद्दल आपल्या चाहत्यांचे आभार मानले. त्याने लिहिले, "तुमच्या प्रेमाचा आवाज आयफा २०२४ मध्ये खूप मोठा होता. तुम्ही अब्रारच्या शांततेचा आवाज बनलात.



# कानपूरमध्ये मेहदी हसन मिराजवर गांधीलमाशीचा हल्ला



भारत आणि बांगलादेश यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना बांगलादेश संघाने पहिल्या डावात सर्वबाद २३३ धावा केल्या. बांगलादेशसाठी मोमिनुल हकने सर्वाधिक १०७ धावांचे योगदान दिले. दरम्यान कसोटीच्या चौथ्या दिवशी एक विचित्र घटना पाहायला मिळाली. बांगलादेशचा क्रिकेटपटू मेहदी हसन मिराजवर फलंदाजी करताना गांधीलमाशीने हल्ला केला. चौथ्या दिवशी लंच ब्रेकच्या आधी ही घटना घडली. लंच ब्रेकच्या १५ मिनिटे आधी सामना थोडावेळ थांबला होता, तेव्हा मिराजला पॅड घातलेले असतानाही त्याच्या गुडघ्याला गांधीलमाशी चावली असल्याचे दिसून आले. याबाबत कॉमेंट्री करत असलेल्या मुरली कार्तिकने ही माहिती दिली.

# दिनविशेष

**घटना**

२००१: काश्मीर आतंकी हल्ला राज्य विधानसभेच्या इमारतीवर अतिरेक्यांनी हल्ला केला त्यात किमान ३८ लोकांचे निधन.
१९९२: कार्टून नेटवर्क चॅनल सुरु झाले.
१९८२ : सोनी कंपनीने पहिले कॉम्पॅक्ट डिस्क प्लेयर प्रकाशित केले.
१९७९: MTR, हाँगकाँग - जलद परिवहन रेल्वे प्रणाली सुरु झाली.
१९७८ : तुवालू - देशाला युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्य मिळाले.
१९७१ : सीटी स्कॅनर रुग्णाचे निदान करण्यासाठी पहिले व्यावहारिक सीटी स्कॅनर वापरले गेले.
१९७१ : वॉल्ट डिस्ने वर्ल्ड, फ्लोरिडा, अमेरिका सुरु झाले. १९६९: कॉनकॉर्ड विमान प्रथमच ध्वनीगती पेक्षा जोरात उडण्यात यशस्वी झाले.
१९६४: जपानी शिंकनसेन (बुलेट ट्रेन) - टोकियो ते ओसाका पर्यंत हाय स्पीड रेल्वे सेवा सुरू.
१९६१: डिफेन्स इंटेलिजन्स एजन्सी (DIA), अमेरिका देशातील पहिल्या लष्करी गुप्तचर संस्थेची स्थापना झाली,

**जन्म**

२०८ : अलेक्झांडर सेव्हरस रोमन सम्राट ( निधन: २१ मार्च ०२३५)
१९८५ : नाझिमुद्दीन अहमद - बांगलादेशी क्रिकेटपटू
१९८४ : चिरंजीवी सर्जा- भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते (निधन: ७ जून २०२०)
१९६९ : मार्कस स्टीफन नाउरू देशाचे २७वे अध्यक्ष
१९६६: अशब उद्दीन भारतीय बंगाली राजकारणी आणि सामाजिक कार्यकर्ते
१९६६ : जॉर्ज वेह लायबेरिया देशाचे २५वे राष्ट्राध्यक्ष
१९५६ : अँड्रस अँसिप - एस्टोनिया देशाचे १५वे पंतप्रधान
१९५६ : थेरेसा माय युनायटेड किंगडम देशाचे माजी पंतप्रधान

**मृत्यू**

२०२२: कोडियेरी बालकृष्णन भारतीय राजकारणी, केरळचे आमदार (जन्म: १६ नोव्हेंबर १९५३)
२०२२ : तुलसी तंती - भारतीय अक्षय ऊर्जा कार्यकारी, सुझलॉनचे संस्थापक (जन्म: २ फेब्रुवारी १९५८)
१९९७ : गुल मोहम्मद - जगातील सर्वात बुटकी व्यक्ती (२२.११)
१९५९: एनरिको डी निकोला - इटली देशाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)
१९५९: इरिको डी निकोला - इटली प्रजास्ताकचे पहिले अध्यक्ष (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)
१९५५: चार्ल्स क्रिस्टी - अमेरिकन चित्रपट निर्माते, क्रिस्टी फिल्म कंपनीचे संस्थापक (जन्म: १३ एप्रिल १८८२)
१९४२: अन्ट्स पिईप - एस्टोनिया देशाचे ७वे पंतप्रधान (जन्म: २८ फेब्रुवारी १८८४)
१९३१ : दिवाकर - नाट्यछटाकार (जन्म: १८ जानेवारी १८८९ )
१८६८: राम (चौथा) - थायलंडचा राजा मोंगकुट ऊर्फ (जन्म: १८ ऑक्टोबर १८०४)
११२७ : मेलिटेनचे मॉर्फिया जेरुसलेम देशाची राणी
०९५९ : एडविग - इंग्रज राजा
०९१८ : झोउ शू साम्राज्याची सम्राज्ञी

# बॉलिवूड सुपरस्टार मिथुन चक्रवर्ती यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्कार जाहीर



बॉलिवूड स्टार मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. ८ ऑक्टोबर रोजी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे. त्यांनी ट्विटमध्ये लिहिले, 'मिथुन दा यांचा उल्लेखनीय चित्रपट प्रवास अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारा आहे.' अश्विनी वैष्णव यांनी पुढे लिहिले, 'मला हे जाहीर करताना अभिमान वाटतो की, दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीने भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल महान अभिनेते मिथुन चक्रवर्तीजी यांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. हा पुरस्कार ८ ऑक्टोबर २०२४ रोजी ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात प्रदान केला जाईल.' अभिनेतेमिथुन चक्रवर्ती यांनी हिंदी, तमिळ आणि बंगालीसह ३५० चित्रपटांमध्ये काम केले आहे. १९७६मध्ये आलेल्या'मृगया' चित्रपटातून त्यांनी करिअरला सुरुवात केली. या चित्रपटातील दमदार अभिनयासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारही मिळाला होता. यानंतर त्याने कधीच मागे वळून पाहिले नाही. १९८२मध्ये रिलीज झालेल्या त्यांच्या'डिस्को डान्सर' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर खळबळ उडवून दिली होती.

# सनस्क्रीन लावूनही त्वचा होतेय काळपट? यामागचं नेमकं कारण काय?



आजकाल अनेकांनी आपल्या स्किनकेअर रुटीनमध्ये सनस्क्रीन वापरण्यास सुरुवात केली आहे. परंतु, नियमित सनस्क्रीन वापरूनही अनेकांना टॅनिंग होते, अशी त्यांची तक्रार असते. यासंबंधी Indianexpress.com ने त्वचारोगतज्ज्ञांशी संवाद साधला आणि सनस्क्रीन वापरण्यातील सामान्य त्रुटी शोधल्या. संवादादरम्यान त्वचारोगतज्ज्ञांनी सनस्क्रीन वापरताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात हेदेखील स्पष्ट केलं.

**सनस्क्रीनचं अयोग्य प्रमाण**

"लोक योग्य प्रमाणात सनस्क्रीन लावत नाहीत. बरेच जण अगदी थोड्याच प्रमाणात सनस्क्रीन वापरतात आणि ते पुरेसं आहे, असं त्यांना वाटतं. तुम्ही कमीत कमी तीन बोटांना पुरेल इतकी सनस्क्रीन वापरावी आणि ती तुमच्या चेहऱ्यावर, मानेवर व कानाला लावावी," असं एस्थेटिक्सच्या संस्थापक, सौंदर्य चिकित्सक व प्रोमेड डॉ. आकांक्षा सिंग कॉर्निट म्हणाल्या.

"सनस्क्रीन लावताना काही लोक संपूर्ण चेहऱ्याला लावत नाहीत; फक्त कपाळ व गालालाच लावतात आणि नाक, कान, गळा विसरूनच जातात. त्यामुळे चेहऱ्यावर लालसरपणा येतो आणि नाकाजवळ पीलिंगदेखील होऊ शकते," असं डॉ. म्हणाल्या.

**SPF 30 पुरेसे नाही**

कॉर्निट यांच्या मते, लोकांचा गैरसमज आहे की SPF 30 भारतीय हवामानासाठी पुरेसं आहे. आपल्या देशात कडक उन्हाचा सामना करताना, SPF 50 पेक्षा कमी SPF चं सनस्क्रीन वापरणंदेखील धोकादायकच ठरू शकतं. "नेहमी ब्रॉड-स्पेक्ट्रम सनब्लॉक निवडा, जो UVA, UVB किरण आणि निळ्या प्रकाशापासून तुमचं संरक्षण करेल. तुम्ही घरात असलात तरीही, इलेक्ट्रॉनिक स्क्रीनच्या दीर्घकाळ वापरामुळे नुकसान होऊ शकते," असं कॉर्निट म्हणाल्या. "सनस्क्रीनची परिणामकारकता कालांतरानं कमी होत जाते.

# राशि भविष्य

**मेष** - खेळ आणि आऊटडोअर ॲक्टीव्हिटीमधील सहभाग तुमचा हरवलेला उत्साह ऊर्जा परत मिळविण्यास सहाय्यभूत ठरेल. आजच्या दिवशी तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे परंतु, या सोबतच तुम्ही दान-पुण्य ही केले पाहिजे कारण यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**वृषभ** - तुमच्या दयाळू स्वभावामुळे आज अनेक आनंदाचे क्षण अनुभवाल. मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल. आपल्या कुटुंबाच्या गौप्य गोष्टींमुळे आश्चर्यचकित व्हाल. प्रेमामधील तुमच्या असभ्य वर्तणुकीची माफी मागा.

**मिथुन** - खेळ आणि आऊटडोअर ॲक्टीव्हिटीमधील सहभाग तुमचा हरवलेला उत्साह ऊर्जा परत मिळविण्यास सहाय्यभूत ठरेल. आज धन तुमच्या हातात टिकणार नाही, तुम्हाला धन संचय करण्यात आज खूप समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**कर्क** - तुमच्यात आज उत्तम स्पुर्ती पहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. दीर्घकालीन, प्रलंबित अशी गुंतवणूक टाळा. मित्रमैत्रीणींबरोबर फिरायला जा आणि काही आल्हाददायक क्षण अनुभवा.

**सिंह** - मानसिक शांततेसाठी तुमचा तणाव दूर करा. जमीन किंवा कुठल्या प्रॉपर्टीमध्ये गुंतवणूक करणे आज तुमच्यासाठी घातक होऊ शकते जितके शक्य असेल तितके या गोष्टींमध्ये गुंतवणूक करण्यापासून सावध राहा.

**कन्या** - तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. आर्थिक स्थितीतील बदल हे नक्कीच होणार आहेत. कुटुंबाबरोबरचे संबंध आणि स्नेह नव्याने दृढ करण्याचा दिवस.

**तूळ** - तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. तुम्ही तुमच्या घरची कर्तव्ये बजावण्याकडे दुर्लक्ष केले तर तुमचा जोडीदार वैतागून जाईल.

**वृश्चिक** - आज घरी बसून आराम करण्याची गरज आहे - आणि आवडते छंद जोपासा व आनंद वाटेल अशा गोष्टी करा. आज केलेली गुंतवणूक तुमच्या समृद्धी आणि आर्थिक सुरक्षिततेला पूरक ठरेल.

**धनु** - आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. मोठया योजना आणि चांगल्या संकल्पना असलेली व्यक्ती तुमचे लक्ष वेधून घेईल - त्या व्यक्तिची विश्वासनीयता तपासून पाहा आणि नंतरच त्या योजनेत गुंतवणूक करा.

**मकर** - मद्यपान करू नका, त्यामुळे आपली झोप बिघडू शकते आणि चांगल्या विश्रांतीपासून तुम्ही दूर जाता. तुमच्या जीवनसाथी सोबत मिळून आज तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकतात आणि अपेक्षा आहे की, ही योजना यशस्वी होईल.

**कुंभ** - नको ते विचार मनात घोळतील. शारीरिक व्यायाम करा कारण रिकामे डोके हे सैतानाचे घर असते. जे लोक लघु उद्योग करतात त्यांना आजच्या दिवशी आपल्या कुठल्या ही जवळच्या लोकांचा सल्ला मिळू शकतो.

**मीन** - आजच्या दिवशी तुम्ही आराम करु शकाल. शरीराला तेलाने मसाज करुन तुमचे स्नायू मोकळे करा. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे कारण, तुमच्या द्वारे दिले गेलेले धन आज तुम्हाला परत मिळू शकते.

# रोहित शर्माचा हवेत झेपावत एकहाती झेल



भारत वि बांगलादेशमधील कानपूर कसोटीत पावसामुळे दोन दिवसांचा खेळ रद्द झाल्यानंतर चौथ्या दिवसाचा सामना वेळेत सुरू झाला. बांगलादेशने ३ बाद १०७ धावा केल्या होत्या, इथूनच पुढे सामन्याला सुरूवात झाली. आता लंच ब्रेकपर्यंत बांगलादेशने ६ बाद २०५ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये बांगलादेशचा फलंदाज मोमिनुल हकने शतक झळकावले आहे. तर भारताच्या गोलंदाजांनी पहिल्या सत्रात ३ विकेट मिळवली. यापैकी रोहित शर्माने लिटन दासचा जो झेल टिपला त्याची जोरदार चर्चा होत आणि त्याच्या कॅचचा व्हीडिओ पण व्हायरल होत आहे.


भारतीय कर्णधार रोहित शर्मा केवळ फलंदाजीने नाही तर सोमवारी त्याने आपल्या क्षेत्ररक्षणानेही सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. बांगलादेशविरुद्धच्या कानपूर कसोटीत रोहितने असा झेल टिपला जे पाहून सर्वच जण चकित झाले. रोहितने असा झेल यापूर्वी क्वचितच घेतला असेल. रोहितच्या या कॅचचे सोशल मीडियावर खूप कौतुक होत आहे.

कानपूर कसोटीत बांगलादेशचा संघ प्रथम फलंदाजीला आला. ५०व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर लिटन दास स्ट्राइकवर होता. तर मोहम्मद सिराज गोलंदाजी करत होता. लिटन दासने खेळपट्टीवर पुढे जात जोरदार शॉट मारला. लिटनने मिड-ऑफवरून चेंडू सीमारेषेबाहेर पाठवण्याच्या हेतूने तो फटका खेळला. मिड ऑफच्या इथे क्षेत्ररक्षणासाठी असलेला रोहितही सावध होता. चेंडू येताच रोहितने एक हात वर हवेत झेप घेतली आणि डाव्या हाताने चेंडू टिपला.

रोहित शर्माने हवेत झेप घेत तो चेंडू टिपल्याने भारताला लिटन दासची महत्त्वाची विकेट मिळाली. लिटनने आल्यापासून जोरदार फटकेबाजी करण्याचा प्रयत्न केला तर बुमराहच्या गोलंदाजीवर चांगले शॉट्स खेळत तो टीम इंडियावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत होता. यानंतर रोहित शर्माने फिल्ड बदलली आणि पुढच्याच षटकात तो बादही झाला.

रोहित शर्माने हवेत झेपावत पकडलेली ती कॅच पाहून सगळेच अवाक् झाले. मैदानात असलेल्या शुबमन गिलने तर डोक्यावर हात ठेवून आश्चर्य व्यक्त केलं. रोहितने तो झेल टिपताच मैदानात धावू लागला तर सर्व खेळाडूही रोहितजवळ येत आश्चर्याने पाहत त्याचं कौतुक करत होते.

# मराठी सिनेमाच्या व्यवसायाविषयी अभिनेते मकरंद अनासपुरे यांचे मत



मराठी चित्रपटसृष्टीतील काही कलाकार हे त्यांच्या खास शैलीमुळे प्रेक्षकांच्या मनात घर करतात. आपल्या सहज अभिनयाने कलाकृतीला न्याय देण्याचे काम हे कलाकार करीत असतात. त्यामुळे त्यांचा वेगळा चाहतावर्ग तयार होतो. अशा कलाकारांपैकी एक अभिनेते म्हणजे मकरंद अनासपुरे हे आहेत. मराठी चित्रपट आणि नाटकांच्या माध्यमातून अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी स्वत:च्या अभिनयाची छाप प्रेक्षकवर्गावर निर्माण केली आहे. 'सरकारनामा', 'वास्तव', 'सातच्या आत घरात', 'सावरखेड : एक गाव', 'खबरदार', 'शुभमंगल सावधान', 'कापूस कोंड्याची गोष्ट', 'आमच्या सारखे आम्हीच' अशा अनेक चित्रपटांतून त्यांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. आता एका मुलाखतीत मराठी सिनेमाच्या व्यवसायाविषयी केलेल्या वक्तव्यामुळे ते चर्चेत आले आहेत. अमोल परचुरेंच्या यूट्यूब चॅनेलला मकरंद अनासपुरे यांनी नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत मराठी सिनेमाच्या व्यवसायाविषयी बोलताना त्यांनी म्हटले, "दिवसा किंवा अगदी दररोज नाटक होत नाही. चार-चार प्रयोग होत नाहीत. तिथे सिनेमापण दाखवा आणि ४० रुपये, ३० रुपये, असा तिकीट दर ठेवा. एसटीचा ब्रॅण्ड ॲम्बेसॅडर मला केल्यानंतर मी त्या भाषणातही बोललो होतो की, तालुका लेव्हलचे जे एसटी डेपो आहेत तिथे मिनी प्लेक्स करा.

## लाडकी बहीण योजनेचा लाभ न मिळाल्याने महिलांचा संताप



**यवतमाळ,(सचिन कदम)** - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे बँका आणि महिलांमध्ये वारंवार संघर्षाची परिस्थिती उद्भवत आहे. बहुतांश महिलांनी बँकेत खाते काढल्यानंतर केवायसी न केल्याने अर्ज करूनही असंख्य महिला लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. सोमवारी घाटंजी येथील महाराष्ट्र बँकेसमोर महिलांनी आंदोलन करून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्याची मागणी केली. बँकेने तत्काळ केवायसी पूर्ण नाही केली तर बँकेत शिरून आंदोलन करण्याचा इशारा दिला.

राज्य सरकारने महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत दरमहा दीड हजार रूपये मानधन सुरू केले. घाटंजी येथील महाराष्ट्र बँकेने महिला खातेदारांची केवायसी पूर्ण न केल्याने असंख्य महिलांना अद्याप या योजनेला लाभ मिळाला नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्या महिलांनी केला आहे. या संदर्भात वारंवार निवेदन देवूनही बँकेकडून पूर्तता न झाल्याने घाटंजी नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष शैलेश ठाकूर यांच्या नेतृत्वात महिलांनी आज महाराष्ट्र बँकसमोर धरणे आंदोलन केले. केवायसीसह इतर नियम समोर करून महिलांना या योजनेपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप यावेळी महिलांनी केला.लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य बँक खात्यात त्वरित जमा करण्याच्या शासनाच्या सूचना आहेत. या योजनेसाठी शासनाने अनेक अटी शिथिल केल्या. असे असतांनाही घाटंजी येथील महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक महिलांना असभ्य आणि अपमानजनक वागणूक देत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्या महिलांनी केला.

# कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात गोंधळ; फेटे उडवून शेतकऱ्यांकडून निषेध



**मुंबई (राकेश गायकवाड):** राज्य सरकारच्या कृषी विभागातर्फे देण्यात येणाऱ्या कृषी पुरस्कार सोहळ्यादरम्यान रविवारी वरळी येथील कार्यक्रमात गोंधळ उडाला. राज्यपालांच्या हस्ते सर्व विजेत्यांना पुरस्कार देण्याच्या मागणीसाठी हा गोंधळ झाला. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी मध्यस्थी केल्यानंतर शेतकरी शांत झाले. या गोंधळावर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली असून शेतकऱ्यांना अपमानित करणे चुकीचे असल्याचे सांगितले. कृषी विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या वर्ष २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षाचे ४४८ पुरस्कारांच्या वितरण सोहळ्याचे आयोजन वरळी येथील एन. एस. सी. आय. क्रीडासंकुलात करण्यात आले. या सोहळ्यास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे उपस्थित राहिले. कृषीमंत्री धनंजय मुंडे आणि राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना नागपूरला जायचे होते. त्यामुळे प्रत्येक गटात प्रातिनिधिक पुरस्कार देण्यात येतील, असे सूत्रसंचालकाने ऐनवेळी घोषित केले. यावरून शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. शेतकऱ्यांनी फेटे उडवून त्याचा निषेध केला. शेवटी मुंडे यांनी मध्यस्थी करीत सर्व शेतकऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देऊ, असे जाहीर केले. त्यानंतर पुरस्कार सोहळा सुरळीत सुरू झाला.

२०२३ मध्ये सोयाबीन व कापूस उत्पादकांना दरामध्ये झालेल्या नुकसानीपोटी प्रति हेक्टरी पाच हजार दोन हेक्टर मर्यादित देण्यात येणार आहेत, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

### राज्यपालांकडून गौरव

कृषी क्षेत्रातील राज्याची भरारी वाखणण्याजोगी आहे. उत्पादन वाढीसाठी बळीराजा करीत असलेले कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले. शेतकरी माझ्यासोबत छायाचित्र काढत नाही, तर मीच शेतकऱ्यांसोबत छायाचित्र काढत आहे, असे सांगून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी स्वहस्ते सर्व ४४८ पुरस्कारार्थी शेतकऱ्यांचा गौरव केला.

## भारती विद्यापीठ परिसरातील आंबेगाव भागात ५६ लाखांची अफू जप्त



**पुणे (अभिजित येरल्लू) :** भारती विद्यापीठ परिसरातील आंबेगाव भागात अफू विक्रीसाठी आलेल्या एकाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्याच्याकडून ५६ लाख ९० हजार रुपयांची दोन किलो ८४५ ग्रॅम अफू जप्त करण्यात आली.

देवीलाल शंकरलाल अहिर (वय ४२, रा. कात्रज) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. भारती विद्यापीठ परिसरातील आंबेगाव भागात एक जण अफू विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी योगेश मांढरे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावला. दुचाकीवरुन आलेल्या अहिरला पोलिसांनी पकडले. पोलिसांनी त्याची चौकशी केली. दुचाकीची डिक्की उघडल्यानंतर त्यात अफू सापडली. पोलिसांच्या पथकाने अफू, दुचाकी, मोबाइल संच असा मुद्देमाल जप्त केला. अहिरने अफू कोठून आणली, तसेच कोणाला विक्री करणार होता, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त गजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, उपनिरीक्षक दिगंबर चव्हाण, योगेश मांढरे, चेतन गायकवाड, प्रशांत बोमादंडी, संदीप जाधव, उदय राक्षे, दिशा खेवलकर यांनी ही कारवाई केली.

# कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्याजवळील ४० फुटी रस्त्यावरील २२ अतिक्रमणे जमीनदोस्त



**कल्याण (आकाश कांबळे ) :** कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या भटाळे तलावात भराव टाकून या भागातील ४० फुटी विकास आराखड्यातील रस्त्यावर स्थानिकांनी बेकायदा व्यापारी गाळे, तबेले, निवासी इमले उभारले होते. संवेदनशील भागातील विकास आराखड्यातील रस्ता बाधित झाल्याने या रस्त्याचे रुंदीकरण खडले होते. शनिवारी कल्याण डोंबिवली पालिकेच्या पथकांनी पोलीस बंदोबस्तात या रस्ते मार्गातील सर्व बेकायदा अतिक्रमणे पोकलेन, जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त केली.

ही कारवाई करताना या भागातील माजी नगरसेवक, काही स्थानिकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. बाजारपेठ पोलिसांनी विरोध करणाऱ्या माजी नगरसेवकाला ताब्यात घेऊन कारवाईत कोणताही अडथळा येणार नाही याची काळजी घेतली. ही कारवाई करण्यापूर्वी क प्रभागाचे साहाय्यक आयुक्त तुषार सोनवणे यांनी अतिक्रमण करणाऱ्या व्यावसायिकांना पूर्व सूचना नोटिसा दिल्या होत्या. शनिवारी सकाळी उपायुक्त प्रसाद बोरकर, साहाय्यक आयुक्त तुषार सोनवणे, सर्वेअर संजय पोखरकर, साहाय्यक आयुक्त सोनम देशमुख, सविता हिले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर गौड आणि तोडकाम पथकाचे ४० कर्मचारी, पोलीस आणि जेसीबी पथकाने भटाळे तलावाजवळील ४० फुटी रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली.

ही कारवाई सुरू करण्यापूर्वी तबेल्यांमधील सुमारे तीनशेहून अधिक म्हशी सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आल्या. कारवाईत अडथळा आणण्यासाठी तबेले चालकांनी म्हशी हेतुपुरस्कर तबेल्यात बांधून ठेवल्या होत्या. कारवाई सुरू होताच एका माजी नगरसेवकाने या कारवाईत अडथळा आणून घोषणाबाजी केली. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली.

गेल्या पंधरा वर्षांच्या कालावधीत या भागातील स्थानिकांनी भटाळे तलावात भराव टाकून तलावाजवळून गेलेल्या या भागातील विकास आराखड्यातील ४० फुटी रस्त्यावर अतिक्रमणे केली होती. हा भाग संवेदनशील असल्याने यापूर्वीचे पालिका अधिकारी या अतिक्रमणांवर कारवाई करण्यास कुचराई करत होते.

# पामतेलाच्या दराचा भडका, आयातीचे सौदे रद्द



**पुणे (शकिल शेख) :** भारतातील खाद्यतेलाच्या आयातदारांनी पामतेलाच्या वाढलेल्या दराचा फायदा घेण्यासाठी पामतेल आयातीचे सुमारे एक लाख टनाचे सौदे रद्द करून परस्पर अन्य देशांना, व्यापाऱ्यांना विकले आहेत. सौदे रद्द झाले तरीही ऐन दिवाळीत तेलाची दरवाढ होण्याची किंवा तेलाचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता नाही. द सॉल्व्हेंट एक्स्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे (एसईए) कार्यकारी अध्यक्ष डॉ. भारत मेहता म्हणाले, भारताने खाद्यतेलाच्या आयात शुल्कात वाढ केली आहे. इंडोनेशिया पामतेलाचा सर्वात मोठा उत्पादक आहे, पण, इंडोनेशियाने पामतेलाचे उत्पादन घटले आहे, त्यात भर म्हणून बी-४० धोरणांतर्गत पामतेलापासून बायोडिझेल तयार करण्यावर भर दिला आहे. दुसऱ्या क्रमांकाचा पामतेल उत्पादक असलेल्या मलेशियाने वाढविलेल्या निर्यात शुल्कामुळे जागतिक बाजारात पामतेलाच्या दरात वाढ झाली आहे. देशातील बंदरावर विविध देशातून आयात होणाऱ्या तेलामध्ये पामतेल सर्वात स्वस्त दराने आयात होत असते. भारताने आयात शुल्क वाढविण्यापूर्वी जुलै महिन्यात कच्चे पामतेल ९७९ डॉलर प्रतिटन दराने आयात होत होते.

# अमरावती जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के



**अमरावती, (नितीन देवळेकर) :** अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा, अचलपूर आणि अंजनगाव सूर्जी तालुक्यातील अनेक भागांत आज दुपारी दीड वाजताच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. अनेक गावांमध्ये भूकंपाचे हादरे बसले. यामुळे काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते.

मेळघाटचा काही भाग, आमझरी, सातपुड्याच्या पायथ्याचा भाग, चिखलदरा, धारणी तालुक्यातील अनेक भागांत हे भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.२ इतकी नोंदवण्यात आल्याची माहिती आहे. जिल्हा प्रशासनाकडून अद्याप यासंदर्भात अधिकृत माहिती देण्यात आली नसली, तरी अनेक गावांमध्ये या भूकंपाचे हादरे जाणवल्याची माहिती गावकऱ्यांनी दिले आहे. भूकंपामुळे हानी झाल्याचे वृत्त अद्याप हाती आलेले नाही.

# राज्यात २३ जिल्ह्यांमध्ये सुरू होणार कॅथलॅब



**मुंबई (विशाल कारंडे) :** बदलत्या जीवनशैलीमुळे हृदय विकाराच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असून त्यामुळे रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील २३ रुग्णालयांमध्ये कॅथलॅब सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये पुढील काही महिन्यांत कॅथलॅब सुरू करण्याचे नियोजित आहे. हृदयविकाराचा झटका आल्याने प्राथमिक व ग्रामीण रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना मुंबई, पुण्यासारख्या शहरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येते. रुग्णालयात पोहोचेपर्यंत अनेकदा रुग्णांना जीव गमवावा लागतो. त्यामुळे रुग्णांना गोल्डन अवरमध्ये उपचार मिळावेत यासाठी राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जिल्हा रुग्णालयांमध्ये विशेषोपचार आरोग्य सुविधा पुरविण्यावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्हा रुग्णालयात हृदयविकाराच्या रुग्णांना अद्ययावत उपचार मिळावेत यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २३ जिल्हा रुग्णालयांमध्ये कॅथलॅब सुरू करण्यात येणार आहेत. एसटी एलिव्हेशन इन मायोकार्डियल इन्फार्क्शन (स्टेमी) प्रकल्पांतर्गत या कॅथलॅब सुरू करण्यात येणार आहेत. राज्यातील २० रुग्णालयांमध्ये ही अतिविशेषोपचार सुविधा उपलब्ध आहेत. मात्र जिल्हा रुग्णालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांचे होणारे हाल लक्षात घेऊन जिल्हा रुग्णालयांमध्ये कॅथलॅब सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कॅथलॅब सुरू झाल्याने जिल्हा रुग्णालयांमध्ये अँजिओप्लास्टी करणे शक्य होणार असल्याचे आरोग्य विभागाचे संचालक डॉ. स्वप्नील लाळे यांनी सांगितले.

एप्रिल २०२१ मध्ये आरोग्य विभागाने स्टेमी हा प्रकल्प सुरू केला. पहिल्या टप्यात पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नांदेड, औरंगाबाद, अकोला, रत्नागिरी, सोलापूर, वर्धासह १२ जिल्ह्यांमध्ये ३८ मुख्य केंद्रे आणि उपकेंद्रे सुरू करण्यात आली होती.

## Manipur DGP asked to secure release of two kidnapped youths: CM



**New Delhi :** Manipur Chief Minister N Biren Singh on Monday said the director general of police has been asked to secure the release of two of the three youths who were allegedly abducted by militants in Kangpokpi district three days ago. The government is discharging its duties to secure their release, he said. "It is a very unfortunate incident. Of the three youths, one was released while the two others are still in the hands of militants. The Centre and the state government are in touch to ensure the safe release of the two youths. We are engaging in talks now," Singh told reporters on the sidelines of the 128th birth anniversary of Jana Neta Hijam Irabot. Hijam Irabot was a legendary leader known for his contributions to the social, political and economic development of Manipur. Accompanied by his two friends, N. Johnson Singh, who was rescued by the army, went for the SSC GD recruitment test for central forces at New Keithelmanbi in Manipur's Imphal West district but took a wrong turn, ending up in Kuki-dominated Kangpokpi, a police officer said.

# EOW issues second summons to CEO of Book My Show parent company



**New Mumbai :** The Mumbai police are probing the matter after an advocate filed a complaint with EOW regarding the alleged black marketing of tickets for the Coldplay concert.

The Mumbai police's Economic Offences Wing (EOW) has issued a second summons to Ashish Hemrajani, CEO of Big Tree Entertainment Private Limited, along with the company's technical head, after they failed to appear before the probe agency on Saturday in a complaint regarding black marketing of concert tickets of British band Coldplay. A senior EOW officer confirmed the development. The second summons was issued on Sunday asking them to remain present before EOW for questioning on Monday for inquiry. The questioning would be part of the preliminary inquiry (PE) opened in the matter by the agency, and EOW will also record their statements, said officials. Sources said the two are likely to visit the EOW office in Mumbai police headquarters near Crawford market on Monday.

The police have begun a probe into the matter after an advocate Amit Vyas on September 23 filed a complaint with EOW regarding the alleged black marketing of tickets for the concert, scheduled in January 2025. Vyas was among lakhs of Coldplay fans who did not get the tickets to the concert.

In his complaint, Vyas made allegations against 23 individuals and entities, including Big Tree Entertainment Private Limited and Hemrajani. The company owns BookMyShow, where the tickets were sold.

## Justice Manmohan takes oath as Chief Justice of Delhi High Court



**New Delhi :** Delhi High Court Acting Chief Justice Manmohan Sunday took oath as the Delhi High Court's Chief Justice. This comes nearly 11 months after he was designated Acting Chief Justice of the Delhi HC on November 9, 2023, following the elevation of Chief Justice Satish Chandra Sharma to the Supreme Court. On July 11 this year, the SC Collegium had recommended Justice Manmohan as Chief Justice of the Delhi HC but the decision remained pending approval with the government for over two months. On September 21, the Centre notified his appointment. He is due to retire on December 16 this year. The oath was administered by Delhi Lieutenant Governor Vinai Saxena in the presence of Delhi Chief Minister Atishi and other dignitaries at Raj Niwas.

# अटल सेतूवर मोटरगाडी थांबवून समुद्रात मारली उडी, शोधमोहिम सुरू

● मुंबई, (यश सावंत) :

अटल सेतूवर मोटरगाडी थांबवून एका व्यक्तीने उडी मारल्याचा प्रकार सोमवारी घडला. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर शिवडी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन शोध मोहिम राबवली. त्या व्यक्तीचा अद्याप शोध सुरु असून त्याच्या कुटुंबियांची माहिती घेण्याचे काम सुरू आहे.



सोमवारी सकाळी दक्षिण प्रादेशिक विभागाच्या नियंत्रण कक्षाला दूरध्वनी प्राप्त झाला होता. त्यात एका व्यक्तीने अटल सेतूवरून उडी मारल्याचे पोलिसांना समजले. शिवडी पोलीस ठाणे हद्दीतील अटल सेतूवरून एका व्यक्तीने समुद्रात उडी टाकून आत्महत्या केल्याची माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोहित खोत, दिवस पाळी पर्यवेक्षक पोलीस निरीक्षक सावर्डेकर, ठाणे अमलदार महिला पोलीस उपनिरीक्षक साकोरे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली.

घटनास्थळी उडी मारणाऱ्या इसमाची लाल रंगाची मोटारगाडी (ब्रेझा) क्र. MH01DT9188 उभी होती. ती मोटरगाडी सुशांत चक्रवर्ती यांची असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. शिवडी पोलिसांच्या हद्दीत अटलसेतूवर ८.५ किमी अंतरावर व्यक्तीने मोटरगाडी थांबवली व त्यानंतर त्याने उडी मारली.

अटल सेतू नियंत्रण कक्ष येथील सीसीटीव्ही चित्रीकरणाची तपासणी केली असता घटना सकाळी ९ वाजून ५७ मिनिटांनी घडल्याचे दिसते. घटनास्थळी बचाव पथक दाखल झाले. त्या व्यक्तीचा स्पीड बोटीच्या साहाय्याने शोध सुरू आहे. संबंधीत व्यक्तीच्या कुटुंबियांची माहिती घेऊन त्यांना याबाबत कळवण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# आचारसंहितेपूर्वी उद्घाटनांचा धडाका

## ‘डबल इंजिन’मुळे राज्याच्या विकासाला गती- मोदी

● पुणे, (अभिजित येरल्लू) :



राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे अधिक जोमाने वाहू लागले असतानाच रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ हजार २४० कोटींच्या काही प्रकल्पांचे लोकार्पण तर काही प्रकल्पांचे भूमिपूजन केले. पुण्यामध्ये झालेल्या या कार्यक्रमाला पंतप्रधान दूरदृश्यप्रणालीमार्फत उपस्थित होते. या वेळी यापूर्वीच्या सरकारची जुनी कार्यपद्धती आणि मानसिकतेमुळे शहरांचा विकास खुंटल्याची टीका करतानाच शिंदे यांच्या नेतृत्वाखालील ‘डबल इंजिन’ सरकारमुळे विकासाला गती मिळाल्याचा दावा त्यांनी केला.


पंतप्रधानांच्या हस्ते शिवाजीनगर-मेट्रो या भुयारी मार्गाचे लोकार्पण तसेच स्वारगेट-कात्रज या विस्तारित मेट्रो मार्गाचे भूमिपूजन करण्यात आले. पुण्यातील भिडेवाड्यात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, सोलापूर विमानतळ, बिडकीन औद्योगिक क्षेत्र अशा ११ हजार २४० कोटींच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन त्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे केले. या वेळी काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर टीका करताना पुण्याचा झपाट्याने होणारा विस्तार लक्षात घेता शहरासाठी यापूर्वीच मेट्रोची आवश्यकता होती, असा दावा केला. यापूर्वीच्या सरकारकडे नियोजन आणि दूरदृष्टीचा अभाव असल्याची टीकाही त्यांनी केली. पंतप्रधान म्हणाले की, देशाच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्राची भूमिका महत्त्वाची आहे. सातत्यामध्ये कोणताही अडथळा आला की राज्याचे नुकसान होते. पुण्यासह राज्यातील अन्य शहरांबाबत हाच प्रकार घडला. मात्र ‘विकसित महाराष्ट्र विकसित भारत’ उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. भविष्याच्या दृष्टीने पायाभूत सेवा-सुविधा आणि विकासाचे लाभ प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचविणे राज्याच्या हिताचे आहे. समाजात बदल घडविण्याची जबाबदारी महिलेकडे येते तेव्हा कशी क्रांती होते, हे सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून देशाने पाहिले आहे. मात्र, महिलांबाबतही यापूर्वीच्या सरकारची मानसिकता चुकीची होती. पायाभूत सुविधांअभावी मुलींना शिक्षण अर्धवट सोडावे लागत होते. सैनिक शाळा, लष्करात मुलींना प्रवेश नव्हता. गरोदरपणाची सुट्टीही महिलांना मिळत नव्हती. ही जुनी मानसिकता भाजप सरकारने पूर्णपणे बदलली आहे. सर्व क्षेत्रात महिलांना संधी देत देशाच्या विकासाचे दरवाजे उघडले असल्याचे मोदी म्हणाले.

सोलापूर : सोलापूर विमानतळाचे लोकार्पण सोहळ्याकडे भाजप आमदार सुभाष देशमुख वगळता महायुतीच्या अन्य दहा आमदारांनी पाठ फिरविल्याचे दिसले. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विमानतळावर करण्यात आले. या वेळी देशमुख आणि सोलापूरचे माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी उपस्थित होते. सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व भाजपचे विधान परिषद सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील अकलूजमध्ये सुशीलकुमार शिंदे यांच्या सत्कार सोहळयासाठी गेले होते. विजयकुमार देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, समाधान अवताडे, राम सातपुते हे भाजपचे आमदार, बबनराव शिंदे , संजय शिंदे , यशवंत माने हे अजित पवार गटाचे आमदार, भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत आणि शिंदे गटाचे आमदार शहाजीबापू पाटील या सर्वांनी लोकार्पण सोहळयाला दांडी मारली.

राज्यात अन्य पक्षांचे सरकार असताना पुण्यासह राज्यातील शहरांचा विकास खुंटला होता. मेट्रो, बुलेट ट्रेन, बिडकीन औद्योगिक क्षेत्र आणि सिंचन क्षेत्रातील अनेक प्रकल्प रखडले. राज्यात शिंदे यांचे ‘डबल इंजिन’ सरकार आल्यानंतर विकासाला गती मिळाली.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

# कारागृह पोलीस भरतीत कॉपी करणाऱ्या ‘मुन्नाभाई’ला अटक



● नागपूर, (नितीन देवळेकर) :

राज्यभरात पोलीस भरती सुरु असून सध्या लेखी परीक्षा घेण्यात येत आहे. पोलीस भरतीत अनुचित प्रकार घडू नये म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकारी डोळ्यात तेल घालून काम करीत आहेत. परीक्षेत कुणीही कॉपी करु नये म्हणून दक्षता घेण्यात येत आहे. मात्र, पोलीस भरतीसाठी मैदानी चाचणीत पात्र ठरल्यानंतर केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी राज्यभरातील परीक्षा केंद्रावर काही ‘मुन्नाभाई’ सक्रिय झाले आहेत. ‘स्पाय माईक’च्या मदतीने कॉपी करुन पेपर सोडवत असल्याची कुणकुण पोलीस अधिकाऱ्यांना होती. असाच एक प्रकार नागपुरात उघडकीस आला असून परीक्षेत ‘हायटेक कॉपी’ करणाऱ्या उमेदवाराला पोलिसांनी अटक केली. परीक्षा केंद्राबाहेरुन प्रश्नांची अचूक उत्तरे सांगणारा त्याचा साथीदार मात्र पळून जाण्यात यशस्वी झाला आहे. किसन सीताराम जोनवाल (२७) असे आरोपी उमेदवाराचे नाव आहे तर जीवन काकरवाल (२९ , दोघे रा. तरट्याची वाडी पो. बाभुळगाव ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर) असे त्याच्या आरोपी साथीदाराचे नाव आहे.

# कल्याण शहराचा पाणी पुरवठा मंगळवारी बंद

● कल्याण, (विवेक गुंजाळ) :

कल्याण डोंबिवली पालिकेच्या बारावे येथील जलशुध्दीकरण केंद्रात महावितरणकडून मंगळवारी ((ता.१) रोहित्र दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. या दुरुस्तीच्या कालावधीत मंगळवारी सकाळी १० ते दुपारी चार वेळेत कल्याण पूर्व, पश्चिम शहरांचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे, असे कार्यकारी अभियंता राजू राठोड यांनी सांगितले.



बारावे जलशुध्दीकरण केंद्राला उल्हास नदीतून पाणी पुरवठा केला जातो. बारावे जलशुध्दीकरण केंद्राला महावितरणच्या बारावे येथील वीज पुरवठा केंद्रातून वीज पुरवली जाते. या वीज केंद्रातील क्रमांक चार व चौदा क्रमांकांच्या रोहित्राची देखभाल आणि दुरुस्तीचे काम महावितरणच्या अभियंत्यांकडून केले जाणार आहे. या दुरुस्तीच्या कामासाठी मंगळवारी सकाळी १० ते दुपारी चार असा सहा तास या केंद्राला होणारा पाणी पुरवठा पालिकेकडून बंद ठेवण्यात येणार आहे.

# शिरुरमध्ये हॉटेल कामगाराकडून पाच पिस्तूल जप्त

● पुणे, (शकिल शेख) :

देशी बनावटीची पिस्तुलांची मध्य प्रदेशातून खरेदी करून विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या हॉटेल कामगारासह साथीदाराला ग्रामीण पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून पाच पिस्तूल, चार काडतुसे जप्त करण्यात आली.

अनिकेल विलास गव्हाणे (वय २०, गव्हाणवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर), मंगेश दादाभाऊ खुपटे (वय २०, रा. जवळा, ता. पारनेर, जि. अहमदनगर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शिरुर बाह्यवळण मार्गावर दी नाना स्पॉट हॉटेलजवळ गव्हाणे आणि खुटे थांबले होते. त्यांच्याकडे देशी बनवाटीची पिस्तूल असून, पिस्तूल विक्री करण्याच्या तयारीत आरोपी असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून दोघांना पकडले. त्यांची झडती घेण्यात आली. त्यांच्याकडे पाच पिस्तूल आणि चार काडतुसे सापडली.



आरोपी गव्हाणे याची पोलिसांनी चौकशी केली. हॉटेलमध्ये काम करताना गव्हाणेची एका चादर विक्रेत्याशी ओळख झाली. मध्य प्रदेशातील सेंधवा येथून पिस्तुलांची खरेदी करुन ती जादा दराने विक्री करुन पैसे कमाविता येतील, असे चादर विक्रेत्याने त्याला सांगितले.

# शेवटची हिरवाई शिल्लक राहू द्या! नवी मुंबईतील क्रीडा संकुलाची जागा बिल्डरना देण्यावर सर्वोच्च न्यायालय नाराज

● नवी दिल्ली, (प्रगती शर्मा) :

नवी मुंबईमध्ये क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी राखून ठेवलेली खुली जागा बांधकाम व्यावसायिकांना देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्य सरकारचा हा निर्णय खेदजनक असल्याचे निरीक्षण सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी नोंदवले. आपल्याकडे आता अगदी कमी हरितक्षेत्र उरले आहे अशी टिप्पणीही त्यांनी केली.



राज्य सरकारच्या २००३मधील एका आदेशानुसार, घणसोली येथील २० एकर जागा क्रीडा संकुलासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. त्यात बदल करून, जागा खासगी बांधकाम व्यावसायिकांना देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानुसार, घणसोलीतील क्रीडा संकुलाची जागेचा काही भाग प्रोग्रेसिव्ह होम्स बिल्डर यांना देण्यासंबंधी सिडकोने अधिसूचना काढली होती. त्याविरोधात ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स’ने २०१९मध्ये उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने जुलै २०२४ मध्ये राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात निकाल दिला होता. त्याला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्य सरकारच्या याचिकेवर सरन्यायाधीश चंद्रचूड आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर २७ सप्टेंबरला सुनावणी झाली. संबंधित जागा बांधकाम व्यावसायिकांना देण्याचा निर्णय घेताना राज्य सरकारने तसेच प्रस्तावित क्रीडा संकुल ११५ किलोमीटर अंतरावर, रायगड जिल्ह्यातील नाणोरे येथे हलवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यावर ‘‘तुम्ही नवी मुंबईमधील क्रीडा संकुल ११५ किलोमीटर अंतरावर हलवत आहात या निर्णयामागील राज्य सरकारची दुर्भावना अगदी स्पष्ट आहे! तेथे कोण जाईल,’’ असे सरन्यायाधीशांनी विचारले.

महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी महाराष्ट्र सरकारची बाजू मांडली. उच्च न्यायालयाने आपल्या आदेशाद्वारे शहर नियोजनामध्ये हस्तक्षेप केला आहे असा युक्तिवाद त्यांनी केला. मात्र, सरन्यायाधीशांनी उच्च न्यायालयाची चिंता योग्य ठरवली. त्यावर मेहता यांनी राज्य सरकारकडून सूचना घेण्यासाठी ४ ऑक्टोबरपर्यंत वेळ मागितला.

# एकात्मिक बालविकास सेवा योजना आणि रॉकेट लर्निंगच्या संयुक्त विद्यमाने ‘उडान महाराष्ट्र २०२४’ राज्यस्तरीय परिषद संपन्न !

## ‘पोषण भी, पढाई भी’च्या माध्यमातून बालशिक्षणाला नवी दिशा दिली जाणार ! - कैलास पगारे, आयुक्त, महिला व बालविकास विभाग

● मुंबई, (विशाल कारंडे) :

एकात्मिक बालविकास योजना (आय.सी.डी.एस्.) आणि रॉकेट लर्निंग यांच्या संयुक्त विद्यमाने येथील ‘सह्याद्र गेस्ट हाऊस’ या ठिकाणी पूर्व-प्राथमिक शिक्षणाच्या अनुषंगाने ‘उडान महाराष्ट्र २०२४’ या राज्यस्तरीय परिषदेचे दिनांक २५ सप्टेंबर या दिवशी आयोजन करण्यात आले होते. या वेळी केंद्रीय महिला व बालविकास राज्यमंत्री माननीय श्रीमती सावित्री ठाकूर, महिला व बालविकास महाराष्ट्र राज्यमंत्री माननीय अदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी व्यासपिठावर महिला व बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे, राष्ट्रीय सार्वजनिक सहकार आणि बाल विकास संस्थेच्या (NIPCCD) सहसंचालिका ECCE डॉ. रीटा पटनायक, SCERT महाराष्ट्र राज्य, उपसंचालक श्रीमती माधुरी सावरकर, रॉकेट लर्निंगचे सहसंस्थापक मा. सिद्धांत सचदेवा हेही उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या प्रारंभी माननीय श्रीमती सावित्री ठाकूर आणि राज्यमंत्री माननीय अदिती तटकर यांनी उद्घाटनपर भाषण केले. या कार्यक्रमाला राज्यभरातील सर्व जिल्ह्यांतील एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका आणि पालक सहभागी झाले होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते ‘पोषण भी, पढाई भी’ प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले, तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ‘बालमंथन मासिक’ आणि ‘नवचेतना’ या अभ्यासक्रमाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रथम सत्रामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने पूर्व प्राथमिक शिक्षणाची नवी दिशा, ‘पोषण भी, पढाई भी’ अभियानाच्या अंमलबजावणीमुळे होणारे संभाव्य बदल याविषयावर चर्चासत्राचे संचलन रॉकेट लर्निंगच्या अपूर्वा देसाई यांनी केले. या वेळी महिला व बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे म्हणाले की, कोविडकाळात लॉकडाऊनमुळे वर्ष २०२० मध्ये ‘शाळापूर्व तयारी’ हे अभियान राबवण्यास सुरुवात झाली. हे अभियान राबवतांना बालकांच्या मातांचा देखिल सहभाग असणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन त्यांचाही सहभाग वाढवण्यात आला. यामुळे मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी फायदा होत आहे. ‘पोषण भी, पढाई भी’च्या माध्यमातून पुढील ३ महिन्यांत ३७००० अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित केले जाणार आहे.

# रायगड मधून 333 ज्येष्ठ नागरिक निघाले तीर्थ दर्शनाला

● अलिबाग, (दिगंबर जाधव) :

अलिबाग - रायगड जिल्ह्यातील पनवेल ,मुरुड ,तळा आणि महाड तालुक्यातील 333 ज्येष्ठ नागरिक हे तीर्थ दर्शनासाठी जाणार आहेत. त्यांचे अर्ज मंजूर झाले असून प्रवासाचे नियोजन करण्यात येत असल्याचे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी सांगितले. शासनाने साठ वर्षे व त्यावरील जेष्ठ नागरिकांसाठी तीर्थ दर्शनासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू केली असून याचा लाभ घ्यावा असेही आव्हान त्यांनी केले आहे.



या योजनेत भारतातील 73 व महाराष्ट्रातील 66 तीर्थक्षेत्रांच्या समावेश आहे. या रायगड मधील पनवेल तालुक्यातील श्री रामाचे दर्शन घेण्यासाठी आयोध्या साठी 139, मुरुड मधून पांडुरंगाच्या दर्शनासाठी 74, तळा येथून पंढरपूर साठी 32, महाड तालुक्यातील गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगावला जाण्यासाठी 34, असे 279 आणि त्यांच्यासोबत सहायक असे 333 जणांचे नियोजन करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातून तीर्थ दर्शनासाठी ३९१ ज्येष्ठांनी समाज कल्याण विभागाकडे अर्ज केले होते. यापैकी 279 जणांचे अर्ज मंजूर केले असून त्यांना सहायक मिळून 333 जण तीर्थ पर्यटन करणार आहेत. '391 अर्ज प्राप्त झाले होते वयाच्या आरोग्याचा प्रश्न विचारत घेता काही अर्ज पात्र ठरवले आहेत. मंजूर अर्ज पालकमंत्री यांच्याकडे पाठवले आहेत. त्यांच्या बस प्रवासासाठी अधिकृत टुरिस्ट कंपन्या तसेच रेल्वे प्रवासासाठी आय आर सी टी सी मार्फत प्रक्रिया सुरू केली आहे.